
# धर्म : मानवी संस्कृती व विकास

डॉ. रावसाहेब कसबे



MR
306
K 15 D

MR 306
K 15 D

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# धर्म : मानवी संस्कृती व विकास

डॉ. रावसाहेब कसबे

लोकवाङ्मय गृह

धर्म : मानवी संस्कृती व विकास / डॉ. रावसाहेब कसबे

Library IIAS, Shimla
MR 306 K 15 D
00124280

म / ९३३

© डॉ. रावसाहेब कसबे

पहिली आवृत्ती (I) : फेब्रुवारी २००५
दुसरी आवृत्ती (I) : जुलै २००६ July 2006

MR
306
K 15 D

किंमत : २५ रुपये Rs. 25/-

124280
31-3-08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

Library IIAS, Shimla
MR 306 K 15 D
00124280

मित्रांनो, धर्माची चर्चा जगातील सर्व समाजात त्यांच्या जन्मापासून सुरू आहे. प्रत्येक धर्मातील अध्यात्म, त्याची जीवनपद्धती, त्याचे धर्मशास्त्र इत्यादींचे निरूपण अनेक वर्षे होत आलेले आहे. धर्माकडे मानवमुक्तीचे, समाजमुक्तीचे एक साधन म्हणून बघितले जात असल्यामुळे धर्मासंबंधीची चर्चा याच दिशेने होत होती. परंतु गेल्या पंधरा-वीस वर्षांत या प्रकारची चर्चा होणे जवळ जवळ थांबले आहे. त्याऐवजी कोणाचा धर्म श्रेष्ठ आहे याचे अभिनिवेशी वाद सुरू आहेत. प्रत्येक धर्मसमूह दुसऱ्या धर्मसमूहाशी स्पर्धा करण्यासाठी रस्त्यावर उतरत आहे. धर्माला राजकीय सत्ताप्राप्तीचे आणि इतर धार्मिक समुदायावर वर्चस्व प्राप्त करण्याचे हत्यार मानले जात आहे. त्यासाठी धार्मिक दहशतवाद, विद्वेष पसरविणारी वक्तव्ये आणि धर्माच्या नावाने प्रचंड हिंसा केली जात आहे. विसाव्या शतकाचे शेवटचे दशक आणि एकविसाव्या शतकाची सुरुवात ही जगात जणू काही प्रचंड सांस्कृतिक संघर्ष चालू असल्याप्रमाणे युद्धमान बनलेली दिसतात. त्यामुळे आज धर्मचिकित्सेची यापूर्वी कधीही नव्हती एवढी गरज निर्माण झाली आहे. ही चिकित्सा माणसाच्या उदय-विकासाचा, त्याच्या जीवनसंघर्षाचा आणि त्याच्या जगण्यातील मूलभूत समस्यांचा विचार करणाऱ्या विविध आधुनिक ज्ञानशाखांच्या साहाय्याने झाली तरच धर्माचे मूळ रूप स्पष्ट होऊ शकेल. त्याचे सामर्थ्य आणि त्याच्या मर्यादांचे आकलन होऊ शकेल. आज धर्माच्या नावाने होत असलेल्या संहाराला थांबविण्याचा तो एक उपाय बनू शकेल.

## धर्माच्या दोन भूमिका

आज जगातील सर्व मानवी समूहांत धर्म दोन प्रकारच्या भूमिका बजावताना दिसत आहे. पैकी त्याची एक भूमिका माणसांना जगण्याचे प्रयोजन शिकविणारी आहे. जीवनसंघर्षात हतबल झालेल्या, दु:ख आणि दारिद्र्याने

पिचून गेलेल्या, अविश्रांत श्रमांनी थकल्या-भागलेल्या; उदास, एकाकी आणि भयग्रस्त बनलेल्या माणसांचे सांत्वन करणे ही धर्माची फार मोठी भूमिका आहे. धर्माचे खरे सामर्थ्य या सांत्वन करण्याच्या शक्तीत आहे. धर्म आणि त्यांच्या संस्थांचा विकास या दृष्टीने काळजीपूर्वक केला असल्याने सामान्य माणसांच्या हृदयात धर्म चिवटपणे अमरत्व प्राप्त झाल्यासारखा बनलेला दिसतो. चार-पाच वर्षांपूर्वी आम्ही लातूरला अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अधिवेशनासाठी दोन-एक हजार लोक एकत्र जमलो होतो. तो दिवस आषाढी एकादशीचा होता. त्याच दिवशी पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात दहा लाख लोक टाळ-मृदंगांच्या गजरात बेभान होऊन नाचत होते. वृत्तपत्रांनी पहिल्या पानावर त्यांची छायाचित्रे छापली होती. आताच दोन महिन्यांपूर्वी नाशिकला कुंभमेळ्यासाठी पन्नास लाख लोक गोदावरी-स्नानासाठी आले होते. प्रसारमाध्यमांनी तिथे आलेल्या साधूंची चैनबाजी, त्यांचे गांजा पिणे, त्यांचे अहंकार, त्यांची आपापसातील भांडणे प्रसृत करूनही नाशिकला माणसांचा अखंड महापूर वाहत होता. तिथे गर्दीत चेंगरून अनेक लोक मृत्युमुखी पडले तरी माणसे येतच होती. का येत होती? कशासाठी येत होती? गोदावरी-स्नान त्यांची कोणती गरज पूर्ण करणार होते? या प्रश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे माणसाचा सर्वांगाने विचार करणे होय. माणूस जसा केवळ भाकरीवर जगत नसतो तसा तो केवळ बुद्धीवरही जगत नसतो. जोपर्यंत माणूस त्याच्या जीवघेण्या जीवनसंघर्षात टिकून राहण्यासाठी स्वत:ची ओळख करून घेण्याइतपत समर्थ बनत नाही, तोपर्यंत तो बुद्धिवादाच्या आधारे वर्तन करू शकत नाही हे आता जवळ जवळ सिद्ध होत चाललेले आहे. माणसाची ही मर्यादा हेच धर्माचे बलस्थान आहे हे आपण आता तरी ओळखले पाहिजे.

धर्माची दुसरी भूमिका ही राजकीय तत्त्वप्रणालींची जागा घेण्याची आहे. सोविएत रशियाच्या विघटनानंतर ही प्रक्रिया अधिक वेगवान झालेली दिसते. अफगाणिस्तानात इस्लामच्या नावाने तालिबानने जे राजकारण केले, धर्माच्या आधुनिकीकरणाऐवजी आधुनिकतेचेच धार्मिकीकरण करण्याचा चंग बांधून बसलेले मुस्लीम आणि हिंदू मूलतत्त्ववादी आज हेच करीत आहेत. त्यांना धर्मनिरपेक्षतेला, भांडवलशाहीला किंवा समाजवादाला आपापल्या धर्माचा पर्याय उभा करायचा आहे. भारतातील हिंदुत्ववादी भांडवलशाही आणि सम्राजवादाला हिंदू जीवनपद्धती 'तिसरा पर्याय' म्हणून उभा करण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्यांचा 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' हा त्याचेच प्रतीक आहे. म्हणून आज धर्माने जगातील सर्व प्रागतिक शक्तींपुढे उभे केलेले आव्हान दुहेरी

आहे. त्याने उभ्या केलेल्या श्रद्धेच्या आव्हानाला धर्मचिकित्सेने आणि राजकीय आव्हानाला राजकारणानेच उत्तर द्यावे लागेल असे मला वाटते. धर्माची चिकित्सा करायची म्हणजे त्याच्या उदय-विकासाची चर्चा करणे ओघाने आलेच. धर्माची चिकित्सा म्हणजे धर्माने या विश्वासंबंधी, माणसासंबंधी, समाजव्यवस्थेसंबंधी जे सांगितले त्याची छाननी विविध ज्ञानशाखांच्या संशोधनावर करणे होय. आधुनिक विज्ञान आपल्याला असे सांगते की, या जगात म्हणजे आपण सर्व माणसे ज्या जगात राहतो त्या जगात नवे काहीही निर्माण होत नसते आणि इथले काहीही नष्ट होत नसते. परंतु आपण तर नित्य नव्या गोष्टी पाहतो आणि त्यांचे नष्ट होणेही अनुभवतो. विज्ञान म्हणते ही सारी परिवर्तनाची प्रक्रिया आहे. हे विश्व गतिमान असल्याने इथे घडणारी प्रत्येक गोष्ट विकास पावते आणि ती मूलतत्त्वात विलीन होते. या विश्वाचे अंतिम सत्य अनित्यता हेच आहे. म्हणूनच आपल्याकडील बुद्ध तत्त्वज्ञानाने जे अनित्य तेच सत्य, जे अनित्य नाही ते सत्य असूच शकत नाही अशी भूमिका घेतली होती. मग धर्माचा उदय या जगात कधी आणि कसा झाला? त्याचा निर्माता कोण? असे प्रश्न आपल्याला पडणे साहजिक आहे.

## देव आणि धर्माचा जन्मदाता माणूस

ज्या जगात आपण राहतो ते जग जड-चेतनाने ओतप्रोत भरलेले आहे. इथे अनेक प्राणी आणि पक्ष्यांचे अस्तित्व आहे. उंच पर्वत आणि खोल समुद्र आहे. प्रचंड आकाराचे वृक्ष आणि इवली इवली फुले देणाऱ्या नाजूक वेली आहेत. एकेकाळी माणसाचा पूर्वज प्राणीही या साऱ्या पसाऱ्यात एक होता. परंतु त्याच्या अंगभूत मर्यादांमुळे तो तिथे रमला नाही. हा सारा निसर्गपसारा सोडून तो त्याच्या बाहेर आला आणि त्याने स्वत:ची अशी एक मानवी सृष्टी स्थापन केली. ही सृष्टी स्वप्रयत्नाने स्थापन करणे ही साधी गोष्ट नव्हती. त्यासाठी त्याने निसर्गाशी प्रचंड संघर्ष केला. निसर्गाच्या रौद्र रूपाने तो भयभीत झाला. नवनव्या गोष्टी घडविताना तो पार थकून गेला. मरणाच्या भीतीने त्याला बेचैन केले. त्याला निसर्गाविरुद्ध लढण्यासाठी बळ हवे होते, मदत हवी होती. तो आधाराच्या शोधात होता. मृत्यूच्या भीतीतून त्याला मुक्त व्हायचे होते. परंतु तो तर त्याला सोडणार नव्हता. त्याचा आघात सहन करण्यासाठी माणून अनेक क्लृप्त्या शोधीत होता. त्याचे बेचैन मन त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. ही बेचैनीच त्याचे स्वत:बद्दलचे भान वाढवीत होती आणि त्याच्या बुद्धीला चालना देत होती. या बेचैनीनेच त्याला

कल्पनाशक्तीची,. प्रतिभेची देणगी दिली आणि ती विकसित केली. त्याच्या विकासक्रमात अथक परिश्रमानंतर त्याने स्वतःच्या प्रतिभाशक्तीने त्याच्या बाहेरील एका शक्तीचे अस्तित्व कल्पिले. तो त्यानेच कल्पिलेल्या या शक्तीला शरण गेला. नेमका तिथेच त्याने परमेश्वराच्या, देवाच्या कल्पनेला जन्म दिला. ही प्रक्रिया जगभर घडली. म्हणून तर विविध समूहांची, देवांची रूपे विविध आहेत. कोणी सूर्याला तर कोणी चंद्राला, कोणी झाडांना तर कोणी दगडांना, कोणी पर्वताला तर कोणी प्राण्यांना देवरूप दिले. मृत्यूच्या भयापासून वाचण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडे प्रार्थना केल्या. देवाला माणसाचे रूप फार उशिरा प्राप्त झाले. या प्रार्थनांतून जगण्यासाठी आत्मबळ मिळते याचा प्राचीन माणसाने अनुभव घेतला. म्हणून तर ऋग्वेदाचा अर्धाअधिक भाग, जुन्या कराराचा म्हणजेच बायबलचा आणि कुराणाचा बराचसा भाग या प्रार्थनांनी व्यापला आहे.

या प्रार्थना जशा मृत्यूपासून वाचविण्यासाठी केल्या जात होत्या तशाच जीवनसंघर्षात ज्या गोष्टी माणसाला हव्या होत्या, त्या मिळाव्यात म्हणूनही केल्या जात होत्या. पाऊस पडण्यासाठी, कुरणे शोधण्यासाठी, लढाईत विजयी होण्यासाठी, अग्नी प्रज्वलित रहाण्यासाठी, सर्वांच्या सुखासाठी अशा अनेक गोष्टींसाठी माणसे प्रार्थना करीत होती. त्यांना जे हवे ते मिळाले तर तो प्रार्थनेचाच परिणाम आहे, असे मानीत होती. माणूस हा सामाजिक प्राणी आहे असे म्हटले जाते. याचा अर्थ तो टोळी करून एकमेकांच्या आधाराने उरदनिर्वाह करीत जगत होता असा आहे. त्यामुळे टोळीला शिस्त लावण्याचा, कामाचे वाटप करण्याचा, माणसामाणसांतील नाती ठरविण्याचा प्रश्नही प्राचीन माणसांना सोडवावा लागला. त्यासाठी त्यांनी वर्तनाचे जे नियम ठरवले, त्यातूनच धर्माची कल्पना जन्म पावली. साऱ्या धर्मशास्त्रांचा आधार हे नियम होते. म्हणूनच धर्माची व्याख्या 'धारयति सः धर्मः' अशी केलेली आहे. जो समाजधारणा करतो त्याला धर्म असे म्हणतात. त्यामुळे आपल्याला असे म्हणता येईल की, देव आणि धर्म या संकल्पनांत मानवी प्रतिभेचा, कल्पनाशक्तीचा अत्युच्च आविष्कार झालेला आहे. या दोन्हीही गोष्टी मानवनिर्मित आहेत. या दोन्हीही गोष्टींचे—म्हणजे देव आणि धर्माचे—आई-बाप आणि पालकही माणूस आहे हे नीट समजून घेतले पाहिजे आणि सर्व मनुष्यमात्रांना ते समजावून, पटवून दिले पाहिजे. आज आपल्यासमोर जे धर्मग्रंथ उपलब्ध आहेत त्यात देवाच्या मुखातून आणि धर्मांच्या आज्ञांतून जे वदविले गेले आहे, सांगितले गेले आहे ते वस्तुतः माणसानेच सांगितले

आहे. ते सारे त्या त्या काळातील माणसाच्या परिस्थितीचे, त्याच्या विश्वाचे त्याला स्वत:लाच झालेले आकलन आहे. त्याचे हे स्वत:चे कर्तृत्व त्याने देव आणि धर्माच्या माथी मारले. कारण स्वत:ची जबाबदारी स्वत:च स्वीकारण्याइतपत माणूस बलवान बनला नव्हता. म्हणूनच त्याला देव आणि धर्माचा आधार हवा होता. तो आधार त्याच्यावर कोणी लादला नव्हता, तर तो त्याने स्वत:च घडविला होता, स्वत:च निर्माण केला होता. परंतु माणूस त्यांच्यापुढे इतका शरणागत झाला की या विश्वाची आणि स्वत: माणसाचीही निर्मिती देवानेच केली आहे असे त्याने देवाच्याच तोंडून वदविले. माणसाला स्वत:च्या उत्पत्तीचा दीर्घ काळ पडलेला प्रश्न त्याने या प्रकारे सोडवला.

## माणसाची उत्पत्ती

आजच्या एकविसाव्या शतकातील माणसासमोरही तोच जुना प्रश्न आजही तसाच आ वासून उभा आहे. स्वत:ची जबाबदारी स्वत:च स्वीकारायची की ती माणूसबाह्य दैवी शक्तीवर टाकून झटकून टाकायची? स्वत:ची जबाबदारी स्वत:च पत्करण्यासाठी माणसाला स्वत:चे ज्ञान आवश्यक असते. स्वत:तील सामर्थ्य आणि मर्यादांची खोल जाण येणे आवश्यक असते. स्वत:चे ज्ञान मिळविण्यासाठी पोषक ठरेल असे वातावरण निर्माण करणे ही पुन्हा त्याचीच जबाबदारी आहे. परंतु माणूस इतका गांजला आहे, इतका भयभीत आणि असहाय बनला आहे की त्याला हे जबाबदारीचे ओझे नको वाटते. ते आपल्याला पेलेल असा त्याला आत्मविश्वास वाटत नाही. म्हणून सुशिक्षित, बुद्धिवादी म्हणविणारी आणि श्रीमंत माणसे देवाधर्माविरुद्ध कितीही बोलोत शेवटी ती तिथेच शरण जाताना दिसतात. पुरोगामी, धर्मनिरपेक्ष, समाजवादी किंवा कम्युनिस्ट होणे म्हणजे स्वत:ची जबाबदारी स्वत:च पेलण्याचे सामर्थ्य कमावणे होय. स्वत:ला जाणणे, know thyself, कृतीत आणणे होय. एका अर्थाने मुक्ती मिळविणे होय. अशा मुक्त माणसांची संख्या जगात थोडी असली तरी ती भविष्यासाठी आश्वासक आहे. त्यांच्याकडूनच मानवजातीपुढील समस्या सुटण्याची अपेक्षा बाळगता येऊ शकते.

आज आपल्याला स्वत:ची ओळख करून घेण्यासाठी मानवजातीच्याच जन्माची जीवघेणी कहाणी समजून घ्यावी लागेल. चार्लस् डार्विनने १८७२ साली *The Descent of man* हा ग्रंथ लिहून उत्क्रांतीचा सिद्धान्त मांडला. तिथून पुढे माणसाच्या उत्पत्तीबद्दलची एक नवी दृष्टी प्राप्त झाली. माणसाबद्दलचे सारे जुने भ्रम दूर झाले. या सिद्धान्ताच्या प्रकाशात पुढे अनेक

विचारवंत संशोधकांनी माणसाबद्दलचे संशोधन अधिक समृद्ध केले. बायबलचा 'जुना करार' ज्या लेखकाने लिहिला असेल त्याने विश्वोत्पत्तीबरोबरच माणसाची उत्पत्ती परमेश्वराने कशी केली हे सांगितले आहे. परमेश्वराने मातीच्या गोळ्यातून स्वत:च्या आकाराची केलेली मूळ मानवाची—'आदम'ची—केलेली निर्मिती आणि त्याला एकाकी वाटू नव्हे म्हणून तो झोपेत असताना त्याच्या फासळीपासून पहिल्या स्त्रीची—'इव'ची—केलेली निर्मिती; त्यांना बागेतील मध्यवर्ती झाडाचे फळ खाण्याची केलेली बंदी, परंतु सापाने इवला बनवल्याने आणि इवच्या आग्रहाने आदमने केलेला आज्ञाभंग, त्या आज्ञाभंगातून मूळ माणसाने—म्हणजे आदम आणि इवने—केलेले मूळ पाप, परमेश्वराने इव, आदम आणि सापाला दिलेले शाप आणि त्यांना स्वर्गाबाहेर फेकून देण्याची शिक्षा इत्यादी साराच तपशील खिळवून ठेवणारा आहे. आजचा माणूस त्याच्या पूर्वज पुरुषाने केलेल्या 'मूळ पापाची'—*ओरीजीनल सिनची*—शिक्षा या पृथ्वीतलावर भोगीत आहे. ख्रिश्चनांचे हेच उत्पत्तीशास्त्र *जेनिसिस* इस्लामनेही स्वीकारले आहे. म्हणूनच त्यांच्या दृष्टीने पापमुक्त होण्यासाठी परमेश्वराला शरण जाणे, त्याची प्रार्थना करणे हाच खरा जीवनार्थ आहे.

हिंदूंचे तर सारेच चमत्कारिक आहे. ज्या काळात मी माझा *मानव आणि धर्मचिंतन* हा ग्रंथ लिहीत होतो, त्या वेळी प्राचीन धार्मिक साहित्यावर अनेक विद्वानांशी चर्चा करण्याचा प्रसंग आला. ज्याला हिंदू लोक ज्ञानाचे भांडार म्हणतात, त्या ऋग्वेदात तर माणसाची उत्पत्ती कशी झाली हे सांगितलेलेच नाही. त्याच्यात वर्णांची, जातींची उत्पत्ती कशी झाली हेच सांगितलेले आहे. ब्राह्मण परमेश्वराच्या मुखातून तर क्षत्रिय त्याच्या बाहूतून, वैश्य त्याच्या जांघेतून तर शूद्र त्याच्या पायातून उत्पन्न झाले असे हे उत्पत्तीशास्त्र आहे. काशीतल्या काही पंडितांच्या जेव्हा मी हे लक्षात आणून दिले की ऋग्वेद माणसाचा विचार करीतच नाही आणि त्यानंतरची सारी धर्मशास्त्रे तर फक्त वर्ण किंवा जातींचाच विचार करतात तेव्हा ते पंडित बरेच अस्वस्थ झालेले दिसले. त्यांपैकी काही तर पदव्युत्तर परीक्षा उत्तम मार्कांनी पास झालेले होते. त्यांपैकी काहींना तर मार्क्स आणि डार्विनचा परिचय असल्याचेही दिसले. त्यांपैकी एक तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा *बुद्ध आणि त्यांचा धम्म* हा ग्रंथ वाचलेलाही दिसला. आपले बहुसंख्य साधू-पंडित पारंपरिक, घनपाठी आहेत हे खरे, परंतु त्यांपैकी थोडेफार चिकित्सकही आहेत. त्यांच्यावर मी एक काम सोपविले. ऋग्वेदात माणसासंबंधी विचार असलेल्या ऋचा एकत्रित करण्याचे ते काम होते. त्यांना ते काय जसे मजेशीर वाटले तसेच ते आव्हानात्मक,

चॅलेंजिंगही वाटते. ''परंतु हे कशासाठी? आम्ही ऋग्वेद पाठ केला परंतु त्याचा या प्रकारे कधी विचारच केला नाही'' असे त्यांनी सांगताच मी त्यांना म्हणालो, ''आतापर्यंत केला नसेल, परंतु आता करा. तसे केले तर ऋग्वेदाच्या कवी-ऋषींचे माणसाबद्दल काय आकलन होते, हे तुम्हाला कळेल आणि आज तुमचे माणसाबद्दलचे काय आकलन आहे याची त्याच्याशी तुलना करता येईल.'' आपली ऋग्वेदाच्या कवी-ऋषींशी तुलना होऊ शकते याचा सूक्ष्म आनंद त्या पंडितांच्या चेहऱ्यावर दिसत होता परंतु अपौरुषय वेदांना कुण्या मर्त्य माणसाने, कवी-ऋषीने रचले आहे हे समजत असूनही ते मान्य करायला मात्र त्याचे मन तयार नसल्याचे जाणवत होते. डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धान्ताबद्दलही आपले असेच होत आहे. आपल्याला तो पटतो पण मान्य होत नाही. तो आपण शिकतो, शिकवितो परंतु तो आपल्या विचारांचा गाभा बनत नाही. त्यामुळेच आपण एका अंतर्दृष्टीला—इनसाइटला—मुकत आहोत. आपण आपल्यापासून, आपल्या स्वत:बद्दलच्या ज्ञानापासून जाणीवपूर्वक अलिप्त राहण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळेच आपण विज्ञानाबद्दल बोलतो खूप परंतु विज्ञाननिष्ठ मात्र बनत नाही. माणसाला खरोखर परमेश्वराने निर्माण केले की तो उत्क्रांतीच्या प्रक्रियेत विकसित होत होत त्याला आजचे रूप प्राप्त झाले आहे? चातुर्वर्ण्य खरोखर परमेश्वराने निर्माण केले की ते समाजविकासाच्या प्रक्रियेत जन्माला आले? या प्रश्नांची खरी उत्तरे आपल्याला आजच्या ज्ञानविज्ञानाने स्पष्ट केली आहेत.

मानववंशशास्त्रज्ञ असे मानतात की, माणसाला म्हणजे त्याच्या मानवजातीला, *ह्यूमन स्पेशीजला,* माणसाबाहेरच्या कोणत्याही शक्तीने जन्माला घातले नाही. माणूस निसर्गातील प्राणिसृष्टीतून उत्क्रांत झाला आहे. त्याच्या प्राण्याचा माणूस बनण्याच्या प्रक्रियेत त्याला अनेक नैपुण्ये कमवावी लागली. त्याने माणूस बनण्याचा केलेला प्रवास फार खडतर होता. पदार्थविज्ञान शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, मुळात हे विश्वच कोणी निर्माण केलेले नाही. तेही एका अपघातातूनच उदय पावले आणि घडत गेले. आइनस्टाईनने 'बिगबँग'चा—महास्फोटाचा—सिद्धान्त मांडून तर्कशुद्ध पद्धतीने, गणिती पद्धतीने या विश्वाचे स्वरूप स्पष्ट केले. एका सूक्ष्मातल्या सूक्ष्म आणि घनातल्या घन पदार्थाचा स्फोट होऊन विश्वाने आकार घेतला. पुढील अनेक शास्त्रज्ञांनी ग्रहातील अंतरे, त्यांचा भ्रमणवेग अचूक सांगितला. पृथ्वीची उत्पत्ती, तिच्यावरची जीवसृष्टी, त्या जीवसृष्टीचा विकास स्पष्ट केला. निसर्गाचे नियम शोधून काढले. यात परमेश्वराचा, त्याच्या इच्छेचा संबंध येतो कुठे? हा सारा

पसारा तर निसर्गनियम आणि माणसांचे कर्तृत्व यांच्या संतुलनातून उभा राहिला आहे.

जगातल्या कोणत्याही आध्यात्मिक गुरूला, प्रवचनकाराला आपण प्रश्न विचारू शकतो की, पंधरा लाख वर्षांपूर्वी आज दिसतो तसा 'माणूस' नावाचा प्राणी या पृथ्वीतलावर होता काय? जर तो नसेल तर त्याला परमेश्वराने जन्माला घातले या म्हणण्याला पुरावा काय आहे? दहा लाख वर्षांपूर्वी तर माणसाचा आदिपूर्वज—ज्याला शास्त्रज्ञांनी *ऑस्ट्रॉलिपिथिकस* असे नाव दिले आहे—प्राणिसृष्टीत अस्तित्वात होता. माणसाचा म्हणजेच त्याच्या जातीचा, स्पेशीजचा, जन्म कधी झाला हे सांगणे निश्चितच अवघड आहे. कारण उत्क्रांतीचा तपशील फार थोड्या प्रमाणात आपल्याला ज्ञात झालेला आहे. मानवजातीचा जन्म या पृथ्वीवर साधारणत: दहा लाख वर्षांपूर्वी झाला असावा. कारण माणसाचा निकटचा पूर्वज *होमो इरेक्टस* त्या काळात अस्तित्वात होता. पुराणवस्तुसंशोधन शास्त्रज्ञांनी त्याचा शोध लावला आहे. *पेकिंग मॅन* हे त्याचे अभिजात रूप आहे. आज आपण ज्या रूपात दिसतो आहोत ते रूप आपल्याला चाळीस हजार वर्षांपूर्वी होमो-सॅपियन सॅपियनच्या रूपातून मिळाले. या विश्वाच्या निर्मितीचा कोट्यवधी वर्षांचा प्रदीर्घ काळ लक्षात घेतला तर चाळीस हजार वर्षे म्हणजे काही फार काळ नाही. परंतु तरीही माणूस जन्मलेला नव्हता. आईच्या पोटातून बाहेर येणे, म्हणजे माणूस म्हणून जन्मणे नव्हे. ती तर जन्माची सुरुवात असते. त्या जन्मातच माणूसपण प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला अनेक गोष्टी कमवाव्या लागतात. म्हणून माणूस कधी जन्मला हे सांगणे फार कठीण आहे. तो जेव्हापासून हत्यारे निर्माण करायला लागला तेव्हापासून की तो गुराखी बनला तेव्हापासून? तो शेतीत स्थिर झाला तेव्हापासून की तो विविध कलांचा निर्माता बनला तेव्हापासून? खरोखर हे सांगणे फार कठीण आहे. कारण माणसाचा जन्म ही काही निश्चित तिथीला घडलेली घटना नाही. ती तर जन्म घेण्याची चालू असलेली अखंड प्रक्रिया आहे. काही मृत्यूपूर्वी माणूसपण प्राप्त करतात तर काही त्याशिवाय मरतात. म्हणून माणूस हा मूलत: प्राणी असला तरी त्याच्यात आणि इतर प्राण्यांत फार भेद आहेत. त्याचा विचार आपल्याला माणूस म्हणूनच करावा लागतो.

आजची माणसे म्हणजे आपण सर्वजण *होमो-सॅपियन सॅपियन* आहोत. काही शास्त्रज्ञांच्या मते उत्क्रांतीच्या प्रक्रियेत अद्याप माणूस जन्मलेलाच नाही. खरा माणूस तर अद्याप जन्माला यायचाच आहे. पाच-सहा महिन्यांपूर्वी *सायबरनेटिक्स*—ज्याला आपण मराठीत संक्रांतिविज्ञान म्हणू शकतो—त्या

शास्त्राचे एक जनक केविन वॉरविक यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे. त्याचे नाव *I cyborg* असे आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की उत्क्रांतिप्रक्रियेत *होमो-सॅपियन*नंतरची पुढची उत्क्रांती *सायबॉर्ग* या माणसाच्या जातीची, *स्पेशीजची,* असेल. आजचे आपण म्हणजे *होमो-सॅपियन* आणि तंत्रज्ञान यांच्या संकरातून ही जाती निर्माण होणार आहे. स्वत: केविन वॉरविक आणि त्याची दुसरी पत्नी दोघेही सहा महिने *सायबॉर्ग* बनले होते. त्यांचे या काळातील अनुभव म्हणजे *I cyborg* हे पुस्तक होय. हे सारे कर्तृत्व देवाचे की माणसाचे? हा प्रश्न आपण धर्मवाद्यांपुढे उभा केला पाहिजे. केविन वॉरविकच्या प्रयोगाबाबत, त्यातील धोक्याबाबत विस्ताराने स्वतंत्रपणे बोलले पाहिजे. परंतु त्याने आजच्या मानवजातीला एक इशारा दिला आहे. आज आपला निकटचा पूर्वज चिंपांझी, एक प्रकारचा माकड, मानला तर आपल्याला तो विचारच असह्य होतो. परंतु वॉरविक म्हणतात ज्या चिंपांझींनी माणूस होण्यासाठी प्रयत्न केले नाहीत ती माकडेच राहिली. आजच्या माणसाकडे, त्याच्या कर्तृत्वाकडे ती दूरवरूनच मिटमिट पाहत राहिली. जे आजचे *होमो-सॅपियन* म्हणजे आपण सर्व जण सायबॉर्ग बनलो नाहीत तर ते उद्याचे चिंपांझी म्हणजे उद्याची माकडे ठरतील आणि आजच्या माकडाप्रमाणेच सायबॉर्गकडे मिटमिट पाहत बसतील.

चार्लस् डार्विनचे उत्क्रांतीचे विचार जेव्हा प्रसिद्ध झाले आणि त्यावर गरमागरम उलटसुलट चर्चा सुरू झाली त्या वेळी एक प्रसंग घडला, तो आपल्याला सांगितलाच पाहिजे असा आहे. एक प्रेमी युगुल एका बागेत एकमेकांच्या बाहुपाशात बसले होते. भारतीय माणूस अशा गोष्टींना फार नाके मुरडतो, परंतु दूरदर्शनवरील इंग्रजी सिनेमे मात्र एकांतात फार चवीने पाहत असतो. दूरदर्शनसंचाने आता ती दृश्ये आपल्याला अति परिचित केली आहेत. प्रेमी युगुल म्हटले म्हणजे एकमेकांच्या सौंदर्याची प्रशंसा ओघाने आलीच. प्रियकर त्याच्या प्रेयसीच्या सौंदर्याची स्तुती करत करत तिला अधिक बिलगत होता. कारण त्यामुळे पुढची सारी कामे सोपी होतात. स्त्रियांना त्यांच्या सौंदर्याचा रास्त अभिमान असतो आणि तसा तो असलाही पाहिजे. परंतु आपल्या सौंदर्याची स्तुती हा स्त्रियांचा सर्वात विक पॉइंट असावा. त्यामुळे प्रेयसीही प्रियकराला योग्य तो प्रतिसाद देत होती आणि तिला मधेच डार्विन आठवला. ती त्याला दूर सारत उद्वेगाने म्हणाली, "ओऽऽह टॉम, व्हाट डार्विन सेज?" भारतीय प्रेयसी—त्यातल्या त्यात महाराष्ट्रीयन—प्रेयसी असती तर "अय्या राम, डार्विन काय म्हणतो? आपला पूर्वज चिंपांझी? खराखरा अंग खाजविणारे केसाळ माकड? काय त्याचे दात, काय त्याचे नाक, काय त्याचे अंगविक्षेप?

इतका घाणेरडा प्राणी आपला .पूर्वज कसा असू शकतो? आपण ईश्वराकडे प्रार्थना करूया की डार्विनचे संशोधन अशास्त्रीय ठरो, चूक ठरो.'' माणसाचा अहंकार त्याला त्याच्या मुळांचा स्वीकार करू देत नाही. त्यामुळेच उत्क्रांतीचा सिद्धान्त शास्त्रीय असूनही, आपल्याला समजत आणि पटत असूनही आपण खोट्या अहंकारांना बळी पडून तो स्वीकारीत नाही आहोत. हे प्रेमी युगुल तर फक्त देवाकडे प्रार्थना करण्यापर्यंतच मजल मारू शकले, परंतु काही लोकांनी तर डार्विनला कायमचेच संपवायचे ठरविले होते. त्यात धर्मगुरू आघाडीवर होते. कारण डार्विनने त्यांच्या धर्मशास्त्राचे प्रामाण्यच मातीमोल केले होते. माणसातील कामवासनेचा थेट सत्याशी संबंध जोणाऱ्या सिग्मंड फ्राईडलाही अशीच टीका, अशीच मानहानी सहन करावी लागली. उत्क्रांतीचा सिद्धान्त परिस्थितीला घडवीत आणि स्वतः घडत गेलेला माणूस हाच विश्वाच्या केंद्रस्थानी मानतो. देव, धर्म, समाज, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान या साऱ्या माणसाने जन्माला घातलेल्या गोष्टी आहेत असे सांगतो आणि त्याचबरोबर माणसाच्या मर्यादांवरही नेमके बोट ठेवतो. आजच्या या एकविसाव्या शतकातील धार्मिक मूलतत्त्ववादी अहंकारी आणि मतलबी आवर्तात सापडलेल्या; सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धीच्या हव्यासापोटी हैवान बनलेल्या; द्वेष, मत्सर आणि स्वार्थांधाने उन्मत झालेल्या माणसाला एक महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागेल. ज्या अज्ञान आणि स्वार्थापोटी तो आपली माणूसपण कमावण्याची शक्तीच गमावून बसत आहे ती कमावण्यासाठी नम्र होऊन आपल्या पूर्वजांचे योगदान मान्य करायचे की नाही? आपले सामर्थ्य आणि वैशिष्ट्य नेमके कशात आहे हे शोधायचे की नाही? आपल्यातील प्रेम, स्नेह, करुणा, औदार्य, आस्था यांचे प्रकटीकरण करायचे की नाही? आजचा माणूस त्याच्या घडण्याच्या उत्क्रांतिप्रक्रियेत ज्या पूर्वज प्राण्यांनी असीम त्याग आणि कठोर परिश्रम करून जे कमावले आणि त्यात संक्रमित केले, त्यांच्याप्रती कृतज्ञ बनला, तर तो त्यांच्याप्रमाणेच स्वतःचा निर्माता बनेल. त्याला माणसाबाहेरील कोणत्याही देवाची, दैवी शक्तीची गरज उरणार नाही. त्याच्या मनात सतत कार्यरत असलेला देव त्याच वेळी रिटायर होऊ शकतो. त्यासाठी सर्व प्राचीन धर्मग्रंथांची, धर्मश्रद्धांची ते मानवनिर्मित मानून उत्क्रांतिवादी विचारांच्या दिशेने चिकित्सा करावी लागेल. त्यांचे निरूपणही उत्क्रांतिवादी सिद्धान्ताशी सुसंगत ठरेल या दिशेनेच केले पाहिजे. हे काम मानवजातीवरील मायेच्या ममतेने, संतांच्या वृत्तीने झाले तर माणूस अंतर्बाह्य बदलेल. माणसातील हा बदलच उद्याच्या सर्वव्यापी पुरोगामी आंदोलनाला जन्म देऊ

शकेल. ती एक चळवळ बनू शकेल. ती चळवळ मध्ययुगीन संतांच्या चळवळीचे आधुनिक, उत्क्रांत रूप असू शकेल. बाबासाहेब आंबेडकरांनी तिलाच धार्मिक क्रांती म्हटले होते. तिच्या पायावरच राजकीय क्रांती यशस्वी होऊ शकते आणि टिकाऊ बनू शकते असे त्यांचे प्रतिपादन होते. न्यायमूर्ती रानडेसुद्धा हीच गोष्ट वेगळ्या शब्दांत सांगत होते. रशियात या धार्मिक क्रांतीशिवाय राजकीय क्रांती केली गेली म्हणून ती अल्पजीवी ठरली. तिथले तरुण जुन्याच धर्मांच्या मागे गेले आणि मशिदी, मदरसे, चर्च यांची संख्या १९८८ ते १९९३ या काळात पाच पटींनी वाढली. १९८८ साली फक्त मॉस्को शहरातील ५० गिरिजाघरांची, चर्चेसची संख्या १९९३ साली २५० वर गेली. मध्य आशियातील १६० मशिदी आणि एक मदरशाच्या दहा हजार मशिदी आणि दहा मदरसे झाले. यावरून साऱ्या जगातील पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष शक्तींपुढे किती मोठी आव्हाने आहेत याची कल्पना येते.

## संस्कृतीचा उगम आणि विकास

माणूस निसर्गाचा अविभाज्य भाग आहे, तो प्राणिसृष्टीतून उत्क्रांत झाला हे खरे असले तरी, माणूस बनण्यासाठी त्याने जी कौशल्ये कमावली ती त्याची स्वत:ची कमाई होती. त्यासाठी माणूसबाह्य कोणत्याही शक्तीची त्याला फारशी मदत झालेली दिसत नाही. तो चार पायांऐवजी मागील दोन पायांवर चालण्यास शिकला आणि पुढचे दोन पाय त्याने हाताच्या रूपात स्वत:जवळ अधिक, वाढीव—surplus—म्हणून वागविले ही त्याच्या विकासक्रमातील पहिली क्रांती होय. आपण लहान मुलाच्या जन्मापासून ते चालण्याचे शिकण्यापर्यंत त्याचे बारीक निरीक्षण केले तरी आपल्याला या प्रक्रियेची सहज कल्पना येईल. सुरुवातीला ते हात-पाय हलविते, नंतर पालथे पडते, त्यानंतर चार पायावर चालल्यासारखे रांगते, नंतर हळूहळू मागच्या दोन पायांवर उभे राहण्याच्या प्रयत्नात अनेकदा पडते, आपण त्याला सावरतो. परंतु पडले, दुखापत झाली म्हणून ते उभे राहण्याचा प्रयत्न सोडून देत नाही. ज्या क्षणी ते तोल सावरून उभे राहते, त्या क्षणी ते जोराने हसून टाळी वाजवते. त्यानंतर एक एक पाऊल उचलते आणि त्यानंतर दुडूदुडू धावते. आज ही गोष्ट मूल वर्ष-दीड वर्षाच्या आत शिकते. परंतु माणसाच्या पूर्वजांना हीच गोष्ट करण्यास हजारो वर्षं लागली. हा आपला पूर्वज प्राणी लक्षावधी वर्षं रांगत होता आणि उभे राहण्याच्या प्रयत्नात हजारो वर्षं वाकून कुबडा होऊन चालत होता. त्याने हे हजारो वर्षांत कमावलेले नैपुण्य संक्रमित होत होत

त्याच्या प्रत्येक पिढीने आपल्यापर्यंत आणले आणि हा हजारो वर्षांचा कालखंड वर्ष-दीड वर्षावर आला.

माणूस उभा राहिला तरी त्याची हाताची बोटे एकमेकांना चिकटलेलीच होती. ती प्रयत्नपूर्वक अलग करून हाताचे प्रत्येक बोट त्याने अंगठ्यावर टेकविण्याचा प्रयत्न केला. यालाच शास्त्रीय परिभाषेत opposibility of thumb म्हणतात. माणूस होण्याच्या प्रक्रियेत माणसाने केलेली ही दुसरी महत्त्वाची क्रांती होती. या निसर्गसृष्टीत फक्त माणूस हाच एक असा प्राणी आहे की, ज्याला त्याच्या हाताच्या अंगठ्याला उरलेली चारही बोटे टेकविता येतात. ही त्याच्या माणूसपणाची एक प्रमुख खूण आहे. आपण कोणत्याही प्राचीन धर्माच्या ऋषी-मुनींच्या, सिद्ध-बुद्ध पुरुष-स्त्रियांच्या हाताच्या मुद्रा पाहिल्या, तर त्यांच्या अंगठ्यावर कोणते ना कोणते तरी एक बोट टेकलेले दिसेल. भगवान बुद्धाच्या मूर्ती याचे अभिजात उदाहरण आहे. या opposibility of thumbच्या कमावलेल्या नैपुण्यामुळेच माणूस हातात दगड घेऊन फेकू लागला आणि हिंस्र प्राण्यापासून स्वसंरक्षण करण्यास शिकला. त्याच हातांनी दगडांची ओबडधोबड हत्यारे केली आणि स्वसंरक्षण आणि शिकार करून पोट भरले. त्याच हातांनी नांगर धरून शेती केली. त्याच हातांनी शिल्पे घडविली आणि चित्रे रेखाटली. त्याच हातांनी बोरूच्या साहाय्याने अक्षरे गिरविली आणि त्याने कमावलेले सारे संचित, सारा ठेवा, सारे अनुभव आपल्यापर्यंत पोहोचवले. त्याच्या या कर्तृत्वाला, या धडाडीला, या परिश्रमांना तोड नाही. अनेक धार्मिक समूहात पूर्वज-पूजेचे अनेक विधी आहेत. ही पूर्वज-पूजेची प्रथा म्हणजे या महान निर्मात्या पूर्वजांना वाहिलेली आदरांजली आहे, त्यांच्याप्रती व्यक्त केलेली कृतज्ञतेची भावना आहे. परंतु माणूस त्याच्या विकासक्रमात जसजसा स्वार्थी बनत गेला, तसतसा तो कृतघ्न बनत गेला. दक्षिण कोरिया, थायलंड, हाँगकाँग आणि सिंगापूरसारख्या देशात १९५० सालापर्यंत हे विधी व्यापक प्रमाणावर होत असत. परंतु त्यांनी इतरांच्या स्पर्धेत उतरून ज्या काळात प्रगतीची घौडदौड सुरू केली तसतशी ही पूर्वज-पूजा लुप्त होऊ लागली. त्यांना त्यांचा जुना धर्म, जुन्या परंपरा समाधान देईनाशा झाल्या. त्यांनाही ख्रिस्ती धर्मासारख्या संस्थात्मक धर्माचे आकर्षण वाटू लागले. त्यामुळे दक्षिण कोरियात १९५० साली एक ते तीन टक्क्यांवर असलेली ख्रिश्चनांची संख्या १९८० साली तीस टक्क्यांवर गेली.

मानवी विकासक्रमात माणसाने हत्यारे निर्माण केली. कारण ती त्याची संरक्षणाची, जीवनअस्तित्वाची, जगण्याच्या सुरक्षिततेची गरज भागविणारी

होती. परंतु ज्या काळात माणसे दगडापासून, लाकडापासून हत्यारे बनवीत होती त्याच काळात तो आणखीही एक कृती करीत होता. ती कृती चित्रे रेखाटण्याची होती. अलतामिरातील गुहेत, स्पेन आणि दक्षिण फ्रान्समधील अनेक अंधाऱ्या गुहांत ही चित्रे संशोधकांना सापडली आहेत. ही चित्रे माणसाची कोणती गरज भागवीत होती, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या चित्रांचा अर्थ लावूनच या प्रश्नाचे उत्तर मिळू शकते. ज्या काळात माणूस भटका होता, शिकारी होता, निसर्गाशी संघर्ष करीत होता त्या काळातील त्याचे जीवनानुभव त्याला या एकांतातील अंधाऱ्या गुहांत जादूमय, मॅजिकल वाटत असावेत. 'जादू' हा फार आकर्षक शब्द आहे. तो माणसात एक सुप्त शक्ती आहे एवढेच सुचविणारा आहे. शिकारी माणसाला त्याच्या जीवनसंघर्षातील ज्या संकटावर मात करायची होती, त्या संकटाशी सामना करताना त्या शक्तीचा माणसाला उपयोग करायचा होता. या सुप्त शक्तीचे प्रकटीकरण करायचे होते. जे. ब्रोनोवस्की यांनी या शक्तीला 'भविष्यात काय घडेल याचा वेध घेणारे अनुमान' (power of anticipation) असे म्हटले आहे. प्राण्याचा माणूस होण्यासाठी आपल्या पूर्वज पुरुषांनी कमावलेली ही शक्ती त्याच्या 'माणूस' म्हणून घडण्यात केलेली तिसरी क्रांती आहे. या शक्तीच्या दुर्बिणीतूनच माणसाने त्याच्या भूतकाळाला आणि भविष्यकाळाला अनेक छिद्र पाडली. याच शक्तीच्या साहाय्याने त्याने भूतकाळातील अनुभवांचा संचय केला आणि भविष्यातील त्यांच्या वारसाचे म्हणजे आपल्या सर्वांचे उन्नयन (ascent) कल्पनेने अनुभवले. याच आपल्या पूर्वज पुरुषांनी आपल्यासाठी ओबडधोबड हत्यारांची निर्मिती करून आजच्या आपल्या विज्ञान-तंत्रज्ञानाचा पाया रचला आणि अंधाऱ्या गुहेत चित्रे रेखाटून आपल्यासाठी संस्कृती निर्माण केली. या संस्कृतीनेच आपण प्राण्याचे माणूस बनलो. प्राणिसृष्टी आणि मानवी सृष्टी यांतील व्यवच्छेदक रेषा म्हणजेच ही संस्कृती आहे. वास्तविक हत्यारे निर्माण करणे आणि चित्रे रेखाटणे ही एकच कृती होती. त्या वेगवेगळ्या गोष्टी नव्हत्या. या चित्रांनीच माणसाची सांस्कृतिक गरज भागविली. अन्न, कामवासनेची तृप्ती या जशा सर्वच प्राण्यांच्या मूलभूत गरजा आहेत आणि एक प्राणी म्हणून माणसाला जशा त्या भागवाव्याच लागतात; तशाच चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, उत्सवप्रियता या फक्त माणसाच्या 'माणूस' म्हणून असलेल्या गरजा आहेत. त्या भागविल्याशिवाय माणसाला समाधानी जगणे शक्यच नाही. केवळ श्रीमंतीतून येणारी सुखे माणसाच्या प्राणी म्हणून असणाऱ्या गरजा भागवितात परंतु त्याच्या सांस्कृतिक गरजा

अपूर्णच राहतात. संस्कृतिशून्य असलेली श्रीमंती म्हणूनच माणसाला हैवान बनविते. व्यसनी आणि भ्रष्टाचारी बनविते. ज्यांच्या जगण्यात आर्थिक स्वावलंबन आणि सुसंस्कृतता यांचे संतुलन असते तीच माणसे समाधानी जीवन जगतात. आपण संस्कृतीचा संबंध धर्माशी, कर्मकांडाशी जोडून फार मोठी चूक केली आहे. धार्मिक माणसाला आपण फार सुंसस्कृत आणि नीतिवान असण्याचा अहंकार त्यातूनच जन्माला आला. हाच अहंकार जेव्हा विशिष्ट धर्मसमूहात सार्वत्रिक होतो तेव्हा आपण इतरांपेक्षा वेगळे, श्रेष्ठ, सुसंस्कृत असल्याचा अभिमान पसरतो. 'गर्व से कहो हम हिंदू हैं', 'अल्ला हाच हाच एकमेव देव आहे आणि अल्लाशिवाय अन्य कोणताही देव असू शकत नाही', 'असंस्कृतांना सुसंस्कृत करण्याची जबाबदारी प्रभू येशूने आमच्यावर टाकली आहे' या प्रकारच्या घोषणा आणि दावे यांतून फक्त अहंकारांचे प्रदर्शन होऊ शकते. माणसामाणसांत, समूहासमूहांत, राष्ट्राराष्ट्रांत, धर्माधर्मात अलगतेचे, परकेपणाचे, शत्रुत्वाचे भाव निर्माण होतात. चातुर्वर्ण्यव्यवस्थेने आणि पुढे जातिव्यवस्थेने याच अहंकारांना जोपासून या पृथ्वीवरील सारी मनुष्यजाती एकाच आदिम प्राण्यातून, एकाच प्राचीन संस्कृतीतून विकसित झाली आहे या सत्यापासून माणसांना दूर केले.

## उद्याच्या धर्मचिंतनाचा पाया

वर्णाच्या श्रेष्ठत्वाचे अहंकार केवढा इतिहास घडवू शकतात हे कोल्हापूरवासीयांना मी नव्याने सांगण्याची गरज नाही. याच नगरीत केवढे रामायण घडले होते. एका व्यसनी आणि बदफैली पुरोहिताने छत्रपती शाहूंसारख्या जनतेच्या राजाला शूद्र संबोधून वेदोक्त संस्कारांना नकार द्यावा, हा धर्म आणि वर्णाने निर्माण केलेला केवढा अहंकार आहे? अशा बदफैली पुरोहिताकडून वेदोक्त संस्कार करून घेतल्याने कोणते पुण्य आणि कोणती मुक्ती लाभू शकते? आपल्याकडे तर मराठ्यांतही श्रेष्ठ-कनिष्ठता आहे. ९६ कुळी आणि कुणबी, कष्टकरी, शेतकरी यांचे परस्परांतील नाते तर अलीकडे राजकीय संग्रामाचे रूप धारण करीत आहे. भारतातील प्रत्येक जातीला आपली जात सर्वश्रेष्ठ आहे असे मनातून वाटते. परंतु जे समर्थ, सत्ताधीश असतात तेच आपले श्रेष्ठत्व इतरांवर लादण्यात यशस्वी होतात. एक गमतीशीर प्रसंग आठवला तो तुम्हाला सांगतो. ज्या काळात लालकृष्ण अडवाणी यांनी अयोध्येत रामाचे मंदिर बांधण्यासाठी रथयात्रा काढली होती, त्याच काळात आमच्या संगमनेरला पाण्याचे फार दुभिक्ष्य होते. प्रत्येक जण आपल्या नळाच्या

खाली खोलवर खड्डे खणून इतरांपेक्षा आपल्याला जास्त पाणी कसे मिळेल या विवंचनेत होता. त्यामुळे मीही एका वडारी जोडप्याला खणायचे काम दिले होते. सायंकाळी चार वाजता अडवाणींचा रथ माझ्या घराजवळून जाणार असल्यामुळे आजूबाजूच्या मध्यमवर्गीय कॉलनीतील स्त्रिया नटूनथटून रस्त्याच्या दुतर्फा उभ्या होत्या. ती गर्दी बघून खड्डा खणणारा वडारी आणि त्याची बायको आश्चर्यचकित झाले. त्या वडारी बाईने मला विचारले, 'दादा रस्त्यावर ही गर्दी कशासाठी जमलीय?' मी तिला लालकृष्ण अडवाणींची रथयात्रा अयोध्येत रामाचे मंदिर बांधण्यासाठी येत असल्याचे सांगितले. त्या बाईने विचारले, 'कोण हा लालकृष्ण?' मी तिला अडवाणींची मला असलेली माहिती सांगितली. तेव्हा ती उद्वेगाने म्हणाली, 'या तुझ्या अडवाणीचा आणि सीता-रामाचा काय संबंध? या अडवाणीने रामासाठी केलं काय? आन् या जमलेल्या बायांनी तरी काय केलं? आम्ही वडाऱ्यांनी जेवढं केलं रामासाठी तेवढं कोनीच नाय केलं,' माझी उत्सुकता वाढली. मी तिला विचारलं, 'तुम्ही काय केलं बाई?' बाई म्हणाली, 'दादा काय नाही केलं?' आख्खी जिंदगी त्याला आणि सीतामायला व्हायली. सीतामायला हरणाच्या कातड्याची चोळी पायजे व्हती. तिनं रामाला त्याच्या शिकारीला पाठवलं. ती एकटीच झोपडीत उरली. तवाच तिला रावणानं पळवून नेलं. हे सारं रामायन या चोळीमुळे झालं. आम्ही तर खरं रामाचं भक्त. चोळीच्या लालचीन सीतामायवर वाईट प्रसंग आला तवापासून आम्ही साऱ्या वडारणींनी चोळ्याच फेकून दिल्या. या सीतामायपायी आम्ही आता बी चोळ्या घालत न्हाय.' ही कथा ऐकून मी तर भांबावूनच गेलो. मग तिने प्रश्न विचारला 'तुझ्या त्या अडवानीच्या बायकोनं चोळी घालायची टाकली? का या बायांनी? आले लागून मोठे रामाचे भक्त.' त्यानंतर तिचा नवरा हातावर थुंकी थुंकून आणि टिकावाला घट्ट पकडून जोरजोरात खणताना म्हणाला, 'दादा, अरे, आमीच खरे रामाचे वंशज. पण पाहा आमचे काय हाल आहेत ते. कोन कुठला हा अडवानी, ना रामाच्या नात्याचा ना गोत्याचा. तो बसलाय रामाच्या रथावर आन् तुमच्या बाया सजल्यात त्याला ववाळायला. आन् आम्ही रामाच्या रक्ताच्या नात्याचे आम्ही खणतोय जमीन आन् बिगर चोळीची बायको वहातीय माती. काय म्हनावं या कर्माला!' ही वडारी दाम्पत्याने सांगितलेली गोष्ट ऐतिहासिक की अनैतिहासिक याचा शोध इतिहाससंशोधकांनी घ्यावा. मला त्यांच्या भावना महत्त्वाच्या वाटल्या. त्यांनी जतन केलेल्या, परंपरेने चालत आलेल्या स्मृती खूप काही सांगून गेल्या.

तुमचे पूर्वज क्षत्रिय होते, असोत. तुमची घराणी उच्चकुलीन होती, ठीक आहे. परंतु या समाजव्यवस्थेत तुम्ही कोण आहात? तुमचे पूर्वज ब्राह्मण, क्षत्रिय असोत वा उच्चकुलीन असोत; ते शूद्रातिशूद्र असोत अथवा आदिवासी भटके असोत; ती सर्व माणसेच होती आणि साऱ्या मानवजातीचा पूर्वज *होमो-इरेक्टस* हा मानव सदृश प्राणी होता. त्या सर्वांचाच जवळचा नातेवाईक, रक्तसंबंधी, आप्त चिंपांझी होता; एक माकड सदृश प्राणी होता. जोपर्यंत आतून, मन:पूर्वक आपण हे सत्य स्वीकारणार नाही तोपर्यंत अखिल मानवजातीबद्दल, तिच्या सुखदु:खाबद्दल तुमच्या मनात सहवेदना कशी प्रकट होणार? परंतु हे जातिधर्माचे, वंश-राष्ट्रांचे अहंकार आपण इतके जोपासले आहेत की ते आपल्याला सोडवता सुटत नाहीत. आपल्या पूर्वज पिढ्यांनी शिकार करीत, गुराखी बनून, शेतकरी बनून, हत्यारे निर्माण करून, ऋग्वेदाच्या ऋचा गाऊन, धम्मपदाच्या गाथा रचून, वेरूळ-अजिंठ्याची शिल्पे कोरून, निसर्गाची गुपिते उकलून आपल्याला या प्रगत अवस्थेपर्यंत आणले आहे. हे खुल्या मनाने मान्य केले तर आपला स्वत:कडे; आपल्या समाजाकडे आणि या अफाट निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन आरपार बदलेल. एक नवी दृष्टी, एक नवी दिशा आपल्याला गवसेल. जातिधर्माचे, वंशश्रेष्ठत्वाचे, संस्कृतिवर्चस्वाचे सारे अहंकार गळून पडतील. सुरुवातीला काही काळ ही मानसिक अवस्था आपल्याला असह्य होईल. निराधार, एकटे, एकाकी, वाटेल. कारण आपण आपले स्वत्व जातीत, धर्मसमूहात, राष्ट्रसमूहात शोधले होते. त्यांचा आपल्याला आधार वाटत होता, हा आधारच गळून पडेल. परंतु त्यामुळे घाबरण्याचे काहीही कारण नाही. जाती आणि धर्मसमूहाऐवजी, राष्ट्र आणि वंशाऐवजी आपण आपले स्वत्व जर अखिल मानवजातीत शोधले तर आपला आधार अधिक व्यापक बनेल. आपण एकटे नाही आहोत, अखिल मानवजाती माझी आहे, माझ्या सुखदु:खात ती सामील आहे; मी जे भोगतो, उपभोगतो तेच भोगणे, उपभोगणे तिच्याही वाट्याला आलेले आहे. सुखी, आनंदी जगण्यासाठी साऱ्यांनी एक बनून दु:ख आणि संकटावर मात केली पाहिजे, हा विचार आपल्या मनात अंकुरेल. तसे झाले तर हेवा, द्वेष, मत्सर, क्रौर्य यांच्याऐवजी प्रेम, करुणा, औदार्य आपल्या मनात अंकुरेल. उद्याच्या साऱ्या धर्मचिंतनाचा हा आधार बनला, तरच मानवजातीपुढे तिनेच निर्माण केलेल्या भीषण समस्या सुटतील. ही गोष्ट सार्वत्रिक रूपात घडेल असे नाही. ज्याची बौद्धिक आणि मानसिक कुवत असेल त्यांच्या बाबतीत हे घडू शकेल. त्यातूनच मानवजातीच्या मित्रांचा, तत्त्ववेत्त्यांचा आणि मार्गदर्शकांचा एक वर्ग तयार

होईल. त्याला कोणत्याही प्रस्थापित धर्माची, धर्मशास्त्राची गरज उरणार नाही. माणसांचा सर्वांगीण विचार करणाऱ्या मानवनिर्मित ज्ञानशाखा त्यांची जागा घेतील. मानवी शरीर आणि मन; व्यक्ती आणि समाज; जीवन आणि मृत्यू; यांचे सम्यक ज्ञान ते मानवजातीला देतील. तेच त्यांना दु:खाची कारणे, दु:ख नष्ट करण्याचे उपाय, जगण्याचे प्रयोजन शिकवतील आणि मरणातील सार्थकताही त्यांना समजावतील. असा प्रयोग भगवान बुद्धांनी भिख्खू संघ स्थापन करून आरंभिला होता. परंतु तो पुढे भ्रष्ट झाला. जागतिक स्तरावर कम्युनिस्टांनी असे जीवनदानी कार्यकर्त्यांचे केडर उभे केले होते, परंतु जागतिक परिस्थितीने त्यांना हतबल केले. ख्रिस्ती धर्माच्या जेसुईट पंथानेही या प्रकारचा उत्तम प्रयत्न केला होता. हे सारे प्रयत्न त्या त्या काळच्या परिस्थितीत योग्य होते. आज परिस्थितीत आमूलाग्र परिवर्तन झाले आहे. म्हणून या प्रकारचे प्रयत्न आजच्या या नव्या वास्तवात नवी दृष्टी घेऊनच आरंभिले पाहिजेत. सामान्य जनतेला आदर्श वाटावा असा जीवनदानी कार्यकर्त्यांचा एक वर्ग, एक केडर उभे करणे ही आपली तातडीची आणि प्रमुख गरज आहे. हा कार्यकर्ता अंगावर भगवी वस्त्रे घालतो की पिवळी; तो पांढरा गाऊन घालतो की सुटाबुटात वावरतो; तो दाढी राखतो की चारचौघांसारखा राहतो, या गोष्टीला फार महत्त्व देण्याचे कारण नाही. त्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाचे, मानवी उत्क्रांतीचे, कला आणि संस्कृतीच्या विविधांगांचे ज्ञान असणे अनिवार्य असावे, या गोष्टीला मात्र महत्त्व दिले पाहिजे. त्याला गीतेवर, कुराण आणि बायबलवर, उपनिषदे आणि धम्मपद यांवर भाष्ये करू देत. परंतु ती ऐतिहासिक दृष्टीने आणि आधुनिक मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र यांच्या ज्ञानप्रकाशांनी प्रकाशित झालेली असावीत.

## प्रस्थापित धर्मांची बलस्थाने

मानवी विकासक्रमात माणसाने अनेक रूपे धारण केली. त्याचा मूळ पुरुष तर शाकाहारी होता. गवताची कोवळी पाने, फुले, फळे हा त्याचा आहार होता. परंतु निसर्ग तर त्याच्याशी वैर करून बसला, त्याने हिमनगांचा वर्षाव करून हिमयुगाला जन्म दिला. त्या बर्फवृष्टीत अनेक प्राणी, वनस्पती नष्ट झाल्या. परंतु माणूस आणि काही प्राणी मात्र शिल्लक राहिले. वनस्पतींच्या अभावाने माणूस हिंस्र प्राण्यांचे अनुकरण करीत मांसाहारी बनला. त्याने हिमयुगाच्या प्रकोपातून वाचण्यासाठी निसर्गाविरुद्ध निकराचे युद्ध केले आणि अग्नीचा महाशोध लावला. ही त्याच्या विकासक्रमातील चौथी क्रांती होय.

अग्नीनेच माणसाचा मांसाहार सुलभ केला. शरीराला अधिक प्रथिने मिळाल्याने तो सुदृढ बनला. त्याच्या मेंदूच्या विकासाचे एक कारण तेही आहे. सदृढ शरीर प्राण्यांच्या मागे धावू लागले आणि प्राण्यांची शिकार करण्यासाठी त्याच्याजवळ वाढीव असलेले हात हत्यारांच्या निर्मितीत गुंतले. त्याचे रिकामे हात जसजशी त्याची शारीरिक शक्ती वाढू लागली तसतसे अधिक काम मागू लागले. माणूस कोणतीही एकच गोष्ट वारंवार आयुष्यभर करीत बसत नाही. तो पहिलीपेक्षा दुसरी अधिक चांगली, तिसरी अधिक सुबक करण्याचा प्रयत्न करीत असतो. हे खास माणसाचेच वैशिष्ट्य आहे. त्यामुळे तो त्याच्या मेंदूकडे नवनव्या गोष्टी करण्याच्या आज्ञा मागू लागला आणि त्याला आज्ञा देण्याची सक्षमता यावी म्हणून मेंदू स्वत:चाच आकार आणि शक्ती वाढवीत राहिला. माणसाकडे हात नसते, त्याने नवे निर्माण करायचे ठरविले नसते, त्याने मेंदूला डिवचले नसते तर त्याचाही मेंदू प्राणी पातळीवरचाच असता. प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ ग्रोवर क्रान्टझ यांनी होमो-इरेक्टसच्या—आपल्या आदीम पूर्वजाच्या—मेंदूचा जो काल्पनिक आलेख काढलेला आहे त्यावरून त्याचा आकार ७५० घ.सें. होता. आजच्या माणसाच्या मेंदूचा आकार सरासरी १४०० घ.सें. झालेला आहे. त्यासाठी लाखो वर्षे जावी लागली. माणसाला मेंदूची वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली देणगी कुण्या दैवी शक्तींनी दिली नाही. ती माणसाने स्वत:च कमावलेल्या हातांनी मिळविली आहे. माणसाचे कृतिशील हात ही त्याच्या मनाची, आत्म्याची, बुद्धीची धार आहेत. म्हणूनच त्या हातांनी मानवी जगासारख्या एका अवाढव्य सृष्टीची निर्मिती केली. स्वप्रयत्नांनी ती विकसित केली.

शिकारी माणसाला वणवण भटकावे लागले. प्राणी जातील तिकडे त्यांच्या मागे फिरावे लागले. तो मेंढपाळ झाला तरी, गुराखी झाला तरी फिरत राहिला, स्थलांतर करीत राहिला; वेगवेगळ्या वातावरणाशी स्वत:ला जुळवून घेत राहिला. माणसाच्या माणूस बनण्याच्या प्रक्रियेतील ही पाचवी महत्त्वाची क्रांती मानावी लागेल. याच काळात त्याचा निसर्गाशी असलेला अतूट संबंध त्याने अनुभवला. पहाटेच्या पूर्वेकडील आकाशातील लालीने तो उल्हसित झाला; हिरव्यागार कुरणांनी सुखावला, उंचच्या उंच पर्वतराजींनी तो आश्चर्यचकित बनला; दुपारच्या उन्हाने त्रासला, रात्रीच्या चांदण्यात न्हाऊन निघाला. त्याने जंगलवणव्यात अग्नीचे आक्राळविक्राळ रूप पाहिले आणि ढगफुटीतून पडलेल्या पावसालाही अनुभवले. तो निसर्गाच्या प्रेमात पडला आणि पाळलेली जनावरे त्याला सखेसोबती वाटू लागली. पुरेशा आणि सकस अन्नाने त्याला

सशक्त आणि देखणे रूप दिले आणि तो स्वत:च्याच शरीराच्या मोहात अडकला. त्याचा जगण्याचा मोहही त्यातूनच उद्भवला. परंतु मृत्यूच्या जाणिवेनेही तो हादरून गेला. माणसाला असलेला जगण्याचा प्रचंड मोह आणि मृत्यूची, मरणाची सततची टांगती तलवार या माणसाच्या सर्वात मोठ्या मर्यादा आहेत. त्यांच्यावर माणसाला अद्यापही विजय प्राप्त न करता आल्याने तो पराधिनता अनुभवीत आहे. म्हणूनच तो त्याच्या बाहेरच्या शक्तीला—मग तो देव असेल, पीर असेल, श्री आसारामांसारखा गुरू असेल किंवा पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यासारखा मार्गदर्शक असेल, यांपैकी कोणाला तरी—शरण जात आहे. जगातील साऱ्या धर्मांनी आणि त्यांच्या धर्मगुरूंनी माणसाची ही कमजोरी, ही मर्यादा नेमकी ओळखली आहे आणि तीच देव, धर्म आणि गुरू यांचे बलस्थान आहे. म्हणूनच माणसाला जन्म आणि मृत्यूचे सम्यक ज्ञान देण्याची जशी आवश्यकता आहे, तशीच जन्म आणि मृत्यू यांच्या मधल्या काळातील जगण्याला अर्थ कसा प्राप्त होईल हे समजून सांगावे लागणार आहे. परंतु माणसे केवळ उपदेशाने बदलत नसतात. ती त्यांची गरज बनावी लागते. ती गरज पूर्ण होऊ शकेल याची त्यांना खात्री वाटावी लागते. तशा प्रकारचे जीवन जगणारी माणसे त्यांच्या संपर्कात यावी लागतात. ती त्यांचा आदर्श बनावी लागतात. मगच माणसे त्यांना अनुसरतात, त्यांचे अनुकरण करतात. कारण माणूस हासुद्धा एक अनुकरणशील प्राणी आहे.

आजच्या माणसासमोरील एक महत्त्वाचा प्रश्न तो स्वत:बद्दल अज्ञानी आहे हा होय. त्याला त्याच्यातल्या सामर्थ्याची जाणीव नसल्याने तो त्याच्या बाहेरच्या काल्पनिक समर्थ शक्तीला शरण जात आहे. धर्मांनी, धर्मशास्त्रांनी ती काल्पनिक शक्ती जणू काही वास्तवातच आहे असे चित्र उभे करण्यात यश मिळविले आहे. मुले होण्यासाठी, त्यातही मुलगाच होण्यासाठी, इतरांपेक्षा अधिक सुख आणि संपत्ती मिळण्यासाठी, दुष्काळ हटवण्यासाठी आणि पाऊस पडण्यासाठीसुद्धा माणसे त्या शक्तीला शरण जात आहेत. आज महाराष्ट्राचा प्रत्येक मुख्यमंत्री आणि मंत्री पाऊस पडू दे, आकाशात ढग येऊ दे यासाठी पंढरपूरच्या विठोबाला साकडे घालताना दिसतो. त्यासाठी तर काही मंडळी, अगदी सुशिक्षित—पाच-दहा विद्यापीठीय डिग्र्या मिळविलेली—पावसासाठी यज्ञ करतात. भगवद्गीतेचा हवाला देऊन त्यांचे हे कार्य सुरू असते. श्रीकृष्ण अर्जुनाला स्वत:ची ओळख करून देताना, आपले कार्य-कर्तृत्व सांगताना ज्या अनेक गोष्टी सांगतात त्यात —

*"तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।*
*अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ।।"*

"मी सूर्यरूपी असलेला तापतो. तसेच पाऊस पाडतो आणि अडवतोही. आणि हे अर्जुना, अमृत आणि मृत्यू, सत् आणि असत् सारे काही मीच आहे." या कर्तृत्वाचाही समावेश आहे. वास्तविक पाहता गीताकारांनी श्रीकृष्णाच्या तोंडी स्वत:बद्दलचा जो मजकूर घातला आहे; तो परमेश्वराबद्दलचा असण्यापेक्षा माणसाबद्दलचाच आहे.

त्याची विस्ताराने चर्चा मी माझ्या *भक्ती आणि धम्म* या ग्रंथात करणार आहे. आता आपण केवळ पावसाबद्दलच बघू. यज्ञाने पाऊस पडल्याचा शास्त्रीय पुरावा आतापर्यंत वैज्ञानिकांना मिळाला नाही. परंतु अमेरिकेतून आणलेले वैमानिक मात्र अनेक मैल आकाशात झेप घेऊन तिथे असणाऱ्या ढगावर रासायनिक द्रव्यांची फवारणी करून पाऊस पाडण्यात यशस्वी झाल्याचे महाराष्ट्रातील दुष्काळी विभागाने पाहिले आहे. त्याचप्रमाणे मास्को शहरात आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट अधिवेशनाच्या वेळी धुवाधार पाऊस बरसत असल्याने त्या संमेलनाला हजर राहण्यासाठी आलेल्या प्रतिनिधींना हॉटेलच्या बाहेर जाणेही मुश्कील बनले होते. परंतु दोन वैमानिकांनी त्यांच्या विमानासह आकाशात झेप घेतली आणि मास्को शहरावरील ढगांना अन्यत्र वळविण्यात त्यांना यश आले. दोन दिवस मास्को शहरावर लख्ख सूर्यप्रकाश होता. जगातले सारे प्रतिनिधी इतके आनंदून गेले की त्यांनी समारोपाच्या सत्रात त्या वैमानिकांचा सत्कार केल्याच्या बातम्या पंधरा-वीस वर्षांपूर्वीच्या प्रसारमाध्यमांनी प्रसृत केल्याचे आठवते. श्रीकृष्ण किंवा इतर कोणत्याही देवाने पाऊस पाडला आणि अडवला की नाही हे माहीत नाही. परंतु वैमानिकांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तो पाडलाही आणि अडवलासुद्धा हे जगाने उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे, अनुभवले आहे.

माणसाच्या मनातील श्रद्धा ही अतिचिवट गोष्ट आहे. ती त्यानेच निर्माण केलेली आणि जिवापाड जतन केलेली गोष्ट आहे. तिची जडणघडण आणि प्रत्यक्ष जगण्यातील तिचे स्थान यांचे सम्यक आकलन करून न घेता तिच्यावर केलेले वार, तिची केलेली चेष्टा, उपहास आणि उडविलेली खिल्ली यामुळे ती नष्ट होणार नाही. माणसाला त्याच्या जगण्याच्या प्रक्रियेत या श्रद्धा कशा अंधश्रद्धा आहेत याचा स्वत:ला आतून अनुभव आला तरच काही घडण्यासारखे आहे. त्यासाठी सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीसारख्या संस्था आपल्याकडे आहेत, ही उद्याच्या दृष्टीने फार मोठी आश्वासक बाब आहे. हे काम इतर सर्व कामांपेक्षा अधिक जोखमीचे असल्यामुळे ते आततायीपणाने नव्हे; तर गांभीर्यपूर्वक, जबाबदारीच्या जाणिवेने

करावे लागेल. श्रद्धा मग ती परमेश्वरावरील असो अथवा गुरूवरील, ती राष्ट्रवादावरील असो अथवा क्रांतीवरील, ती धर्मावरील असो अथवा एखाद्या पंथावरील ही फार वैयक्तिक गोष्ट आहे. म्हणूनच तिचे रूप विविधांगी आहे. जितकी माणसे तितकी त्यांची देवाची रूपे, जितके क्रांतिकारी गट तितक्या क्रांतीच्या कल्पना विविध, जितके राष्ट्रवादी तितकी त्यांची राष्ट्राची कल्पना भिन्न. कोणाची धर्मावर आधारलेली तर कोणाची जातीवर, कोणाची वंशावर आधारलेली तर कोणाची प्रदेशावर. कोणाची विवेकनिष्ठ तर कोणाची समताधिष्ठित. या सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवजातीचे कल्याण कशात आहे ही आहे. जोपर्यंत या कल्याणकारी सामुदायिक मार्गात परमेश्वरावरील एखाद्याची श्रद्धा आड येत नसेल तर त्याने आपल्या घरात श्रीकृष्णाची पूजा केली काय किंवा गणपतीची; दुर्गामातेची पूजा केली काय किंवा मरी आईची मेकू आईची, शंकराची प्रार्थना केली काय की एखाद्या पिराची किंवा साईबाबाची, त्याने काय फरक पडतो? प्रश्न उपस्थित त्याच वेळी होऊ शकतो जेव्हा ही श्रद्धा, ही पूजा, ही प्रार्थना सार्वजनिक कल्याणाच्या आड येते तेव्हा. त्या वेळी तिला जबाबदारीच्या भावनेने आणि ठामपणे विरोध करणे कर्तव्य होऊन बसते. ही आजची खरी धर्मनिरपेक्षतेची व्याख्या बनू शकेल. परंतु उद्यासाठी प्रयत्न चालूच ठेवावे लागतील. ज्या विनाशकारी श्रद्धा माणूस उरात बाळगून आहे, त्यातून त्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न अखंड चालू ठेवावे लागतील आणि त्या प्रयत्नात त्याला स्वत:लाच सहभागी करून घ्यावे लागेल. हे सारे नीट समजून घेण्यासाठी आपल्याला कार्ल मार्क्स यांचे धर्मचिंतन फार उपयोगी पडू शकेल असा मला विश्वास वाटतो.

## कार्ल मार्क्स यांचे धर्मचिंतन

माणूस त्याच्या जन्मापासून दोन प्रकारची द्वैते, दोन प्रकारच्या विसंगती, दोन प्रकारच्या Dichotomies दोन खांद्यावर घेऊन प्राणिसृष्टीकडून मानवी सृष्टीकडे प्रवास करीत आहे. त्यातले प्रमुख द्वैत हे जगण्याची दुर्दम्य इच्छा आणि मरणाची सततची टांगती तलवार हे आहे. हे माणसाचे 'मूलभूत द्वैत' आहे. त्याच्या अस्तित्वातील ही मूळ विसंगती आहे, मूळ अंतर्विरोध आहे. हे द्वैतच धर्माचे प्रमुख बलस्थान आहे. कारण या अंतर्विरोधातून माणूस अद्याप मुक्त होऊ शकला नाही. त्याला यातून मुक्ती देणारी कोणतीही संस्था, संघटना, शक्ती माणसाबाहेर अस्तित्वात नाही. हे द्वैत त्याला एकट्यालाच एकाकीपणे सोडवायची जबाबदारी पार पाडायची आहे. दुसरे द्वैत हे त्याच्या सामाजिक



124280

विकासक्रमातून उद्‌भवले आहे. त्याने विवाहसंस्था जन्माला घातली, कुलसंस्था निर्माण केली, राज्यसंस्थेला जन्म दिला, खाजगी मालकीची कल्पना वास्तवात राबविली. त्यातून गुलामगिरी आली, सामंतशाही आली, भांडवलशाही आली. आज तर जागतिकीकरणाचा बोलबाला जोरात आहे. त्यामुळे समाजात वर्ग, वर्ण, जाती, स्त्रीदास्य अस्तित्वात आले. कार्ल मार्क्स यांनी माणसाच्या या प्रत्यक्ष जगण्यावर, त्याने घडविलेल्या आणि विकसित केलेल्या समाजवास्तवावर अधिक भर दिला हे खरे आहे. माणसाच्या या सामाजिक विकासक्रमाची ऐतिहासिक चिकित्सा मानवजातीच्या इतिहासात मार्क्स यांनी पहिल्यांदा वैज्ञानिक पायावर केली हे त्यांचे मोठेपण आहे. माणूस त्याच्या जीवनसंघर्षात ज्या शोषणाच्या, अमानुषतेच्या, पिळवणुकीच्या चक्रात सापडला आहे. त्यातून त्याला मुक्त करण्यासाठी कार्ल मार्क्स यांनी शास्त्रीय समाजवादाची मांडणी केली आहे. त्या निमित्ताने त्यांनी केलेले धर्मचिंतन अभूतपूर्व आहे.

कार्ल मार्क्स म्हणाले, 'मानवी जीवनाच्या म्हणजेच माणसांनी घडविलेल्या इतिहासाची तुम्हाला चिकित्सा करायची असेल, तर त्या साऱ्या चिकित्सेचा पूर्वपक्ष, त्या चिकित्सेचे premise, हा धर्मचिकित्सा, criticism of religion असला पाहिजे.' कार्ल मार्क्स यांना माणसांची केवळ भौतिक मुक्ती हवी होती असा अनेकांचा गैरसमज आहे. तो तसा होण्यासाठी मार्क्स यांनी प्रत्यक्ष जीवनसंघर्षावर दिलेला भर हे जसे एक कारण आहे तसेच कम्युनिस्ट चळवळींनी राजकीय क्रांतीसाठी ज्या डावपेचांचा उपयोग केला ते डावपेचही आहेत. परंतु मुळात कार्ल मार्क्स यांना माणसाची जशी भौतिक मुक्ति अभिप्रेत होती, तशीच आत्मिक मुक्तीही अभिप्रेत होती. म्हणूनच त्यांना धर्मशक्तीचे दुहेरी रूप स्पष्ट दिसले. त्यांनी या धर्मशक्तीला म्हणूनच एकाच वेळी वास्तविक दुःखाची अभिव्यक्ती, the expression of real misery आणि वास्तविक दुःखाविरुद्धचा विद्रोह, revolt against real misery मानले. मार्क्स म्हणाले, 'धर्म हा पीडित प्राण्याचा उसासा आहे, हृदयशून्य जगाची प्रतिक्रिया आहे, आत्मशून्य परिस्थितीचा आत्मा आहे, धर्म ही माणसाची अफू आहे. It is opium of the people.' (परिशिष्ट १ पहा).

वास्तविक पाहता, मार्क्स यांचे हे धर्मचिंतन भारतासारख्या धार्मिक प्रेरणा प्रबळ असलेल्या आणि धर्मचिंतनाचा प्राचीन वारसा असलेल्या देशात फार चांगल्या प्रकारे समजावून सांगता आले असते. मार्क्स यांच्या या धर्मचिंतनाला बुद्ध तत्त्वज्ञानाची आणि मध्ययुगीन संतमंडळाच्या कवितांची पार्श्वभूमी देऊन ते स्पष्ट झाले असते, तर भारतात गेल्या पंधरा वर्षांपासून हिंदू आणि मुस्लीम

मूलतत्त्ववाद्यांनी जो प्रतिकारशून्य हैदोस घातला, तो त्यांना घालता आला नसता. त्याविरुद्ध प्रतिकार करणारी, त्यात हस्तक्षेप करणारी मोठी कामगार चळवळ आपल्याकडे होती. या प्रयत्नाअभावी आपली सारी कामगार चळवळच दुभंगून गेली. दिवसभर सारे कामगार पगारवाढीसाठी, बोनससाठी, कम्युनिस्टांच्या, समाजवाद्यांच्या ट्रेड युनियनमध्ये, कामगार संघटनात सक्रिय असत. परंतु सायंकाळी मात्र ते एक तर हिंदुत्ववाद्यांच्या भजनी मंडळात असत किंवा भांडवलदारांच्या कृपेने गल्लोगल्ली असलेल्या दारूच्या गुत्त्यावर असत. आजही भारतीय कामगारवर्गापुढे सांत्वन प्राप्त करून घेण्याचे हे दोनच मार्ग उपलब्ध आहेत. आपली कामगार चळवळ आजही वर्गीयदृष्ट्या फार पुरोगामी आहे. परंतु सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या तितकीच प्रतिगामी आहे. या वास्तवाबद्दल आत्मटीकेची जबाबदारी कोणत्याही पुरोगामी संघटनेच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना टाळता येणार नाही. त्यांनी ती टाळूही नये.

कार्ल मार्क्स यांचे धर्मचिंतन आपल्या संतमंडळांच्या अभंगांच्या, त्यांच्या जगण्याच्या, त्यांच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर फार उत्तम प्रकारे स्पष्ट करता येऊ शकते. आपला तुकाराम खरा महापुरुष, महान कवी आणि उपदेशक. आपल्या चोखोबाने जे भोगले आणि त्या भोगातूनही जे अनुभवले, अभिव्यक्त केले त्याला तोड नाही. आपण आपल्या विसाव्या-एकविसाव्या शतकाची आधुनिक मूल्ये या महान मध्ययुगीन संतावर लादून त्यांच्यावर फार मोठा अन्याय केला आहे. मार्क्स म्हणाले, 'धर्म ही वास्तविक दु:खाची अभिव्यक्ती आहे.' ती चोखोबांनी तेराव्या शतकात पुढील शब्दांत अभिव्यक्त केली आहे :

*"किती धांवाधांवी करावी कोरडी । न कळें काही जोडी हानि लाभ ॥*
*जे जे करितों तें तें फलपट । वाउगेचि कष्ट दु:ख भोगी ॥*
*निवांत बैसोनीं नामाचें चिंतन । करू जाता मन स्थिर नाही ॥*
*दानधर्म करू तो नाही धन पदरी । जन्माचा भिकारी होउनी ठेलो ॥*
*चोखा म्हणे ऐसा करंटा मी देवा । काय तुझी सेवा करू आता ॥*

मार्क्स म्हणाले, 'धर्म हा वास्तविक दु:खाविरुद्धचा विद्रोह आहे.' चोखोबा म्हणाले,

*''आता कोठवरी । भीड तुमची धरू हरी ॥*
*दार राखीत बैसलो । तुम्ही दिसे मोकलिलो ॥*
*ही नीत नव्हे बरी । तुमची साजे तुम्हा थोरी ॥*
*चोखा म्हणे काय बोलो । आमुचे आम्ही वाया गेलो ॥''*

कार्ल मार्क्स म्हणाले,"धर्म हा पीडित प्राण्याचा उसासा, हृदयशून्य जगाची प्रतिक्रिया, आत्मशून्य परिस्थितीचा आत्मा आहे. तुकोबा म्हणाले;

*“न बोलावे परी पडिला प्रसंग । हाकलिते जग तुझ्या नामे ॥*
*लटिके चि सोंग मांडिला पसारा । भिकारी तू खरा कळो आले ॥*
*निलाजिरी आम्ही करोनिया धीर । राहिलो आधार धरोनिया ॥*
*कैसा नेणो आता करिसी सेवट । केली कटकट त्याची पुढे ॥*
*तुका म्हणे काही न बोलसी देवा । उचित हे सेवा घेसी माझी ॥”*

मार्क्स म्हणाले, ‘धर्म ही लोकांची अफू आहे.’ 'Opium of the people' तुकोबा म्हणाले;

*“जाऊ देवाचिया गावा । देव देईल विसावा ॥*
*देवा सांगो सुखदुःख । देव निवारील भूक ॥*
*घालू देवासीच भार । देव सुखाचा सागर ॥*
*राहो जवळी देवापाशी । आता जडोनि पायासी ॥*
*तुका म्हणे आम्ही बाळे । या देवाची लडिवाळे ॥”*

कार्ल मार्क्स यांच्या ‘धर्म ही लोकांची अफू आहे’ या वचनाचा अनेकांनी फार चुकीचा अर्थ लावला आहे. ‘धर्म ही अफूची गोळी’ आहे असा अर्थ लावून मार्क्सला धर्म माणसासाठी अफूची गोळी कशी आहे यावर मार्क्सच्या विरोधकांनी भरपूर निरूपणे केली आहेत. मार्क्स 'Opium of the people' म्हणाले होते, ‘लोकांची अफू’ म्हणाले होते. लोकांसाठी अफू 'Opium for the people' असे म्हणाले नव्हते. कार्ल मार्क्स यांच्या दृष्टीने धर्म हे माणूसबाह्य शक्तींनी माणसाला जबरदस्तीने दिलेले गुंगीचे, नशेचे, उत्साहवर्धक पेय नव्हते. ते माणसाने असह्य, कठोर, हृदयशून्य वास्तवाला सामोरे जाण्याचे बळ कमविण्यासाठी स्वतःच निर्माण केले होते. ही त्याची स्वतःची निर्मिती होती. मानवी समाजविकासाच्या एका टप्प्यावर ती माणसाची गरज बनली होती. म्हणूनच ती सार्वत्रिक झाली होती. धर्म ही माणसाची गरज केव्हा आणि का बनते याची मीमांसा म्हणजे धर्मचिकित्सा होय.

हे मार्क्स यांचे धर्मचिंतन, ही धर्मचिकित्सा स्पष्ट करण्यासाठी आपल्याजवळ आपल्या मध्ययुगीन संतांचे समृद्ध साहित्य आहे. तुकारामांच्या गाथेचे कोणतेही पान उघडा तुम्हाला एक नित्य नवा अनुभव येईल. जगण्याचे बळ प्रतिकूल परिस्थितीतही तुकोबांनी कसे प्राप्त केले, हे समजेल. तुमच्या जीवनसंघर्षात तुकारामासारखा एक साथी, एक सहप्रवासी तुम्हाला लाभेल. तुम्हाला एकाकी, एकटे वाटणार नाही. त्याची साथ तुमचा आधार बनेल. म्हणूनच मी माझ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना सांगत असतो; तुम्ही जेव्हा पहिला पगार कमवाल, विद्यार्थिनींना सांगत असतो, तुमच्या नवऱ्याने तुम्हाला

लग्नानंतर काही पैसे दिले, तर त्यातून पहिल्यांदा तुकारामाच्या गाथेची एक प्रत विकत घ्या आणि आपल्या घरात ठेवा. कोणतेही पान उघडा आणि एक-दोन अभंग वाचा.

आपण क्रांतीसाठी कामगार, शेतकरी यांच्या संघटना उभ्या केल्या. त्यांना पुरोगामी विचार दिले. परंतु या वर्गाचे वैचारिक पोषण एकेकाळी ग्रामदेवतांनी आणि संतांच्या अभंगांनी भजनांतून, कीर्तनांतून, प्रवचनांतून परंपरा टिकविण्यासाठी झालेले होते; हे आपण विसरून गेलो. याच अभंगांचा परंपरा मोडण्यासाठी, प्रत्यक्ष जगण्यातील संघर्षाचे भान येण्यासाठी उपयोग करता येऊ शकतो; याकडे आपले लक्षच गेले नाही. म्हणूनच आपल्या देशातील पुरोगामी चळवळ नेहमीच दुभंगलेली, द्विधा मन:स्थितीत राहिली. त्यामुळेच ती मूलतत्त्ववाद्यांच्या, धर्मवेड्यांच्या कारवायांत हस्तक्षेप करू शकली नाही. तिच्याकडे शक्ती नव्हती किंवा आजही तिच्याजवळ शक्ती नाही असे नाही. उलट शेतकरी-कामगारांची शक्ती आजही आपल्या देशातील सर्वोच्च शक्ती आहे; परंतु या कामी त्या शक्तीचा उपयोग करायचा की करायचा नाही, याचा निर्णय होत नाही. त्यामुळेच आपल्यासमोर फार मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. साऱ्या संतमंडळाच्या कवितेचे सद्य:कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आधुनिक दृष्टीने निरूपण करणे म्हणजे धर्मचिकित्सा करणे होय. क्रांतीसाठी जसे क्रांतिकारी सैन्य लागते तसेच लेखक, कलावंत, विचारवंतही लागतात. इतकेच नव्हे तर निरूपणकार, प्रवचनकार आणि भाटही लागतात. क्रांतिविरोधकांनी, प्रतिगाम्यांनी जसे त्यांचे सैन्य, अगदी बहुजन समाजातूनसुद्धा, पतितपावन, बजरंगदल, विद्यार्थी परिषद इत्यादी माध्यमांतून उभे केले. अनेक प्रवचनकारांना, साधुपुरुष म्हणवून घेणाऱ्यांना कामाला लावले तसेच आपल्यालाही आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी या गोष्टी कराव्या लागतील. पाश्चिमात्यांनी त्या केल्या नसतील कारण त्यांची परिस्थिती आपल्यापेक्षा भिन्न आहे, त्यांचा सामाजिक आणि वैचारिक वारसा आपल्यापेक्षा वेगळा आहे. भारतीय समाजमन त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह समजून घेतल्याशिवाय आपल्याला भारतात समाजपरिवर्तन किंवा क्रांती करता येणार नाही. दु:ख याचे आहे की आपल्याजवळ त्यासाठी सर्व प्रकारची सुप्त शक्ती असूनही तिचा उपयोग आपल्याला करता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दिशेने गंभीर विचार केला होता. त्या संबंधीही दोन गोष्टी आपल्याला सांगितल्या पाहिजेत.

## आंबेडकरांचा बुद्ध धम्म

आपल्या देशाचे सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांना डॉ. आंबेडकर हे त्यांच्या काळातील सर्वश्रेष्ठ बुद्धिवंत वाटत होते, तर जगातील एका थोर राज्यशास्त्रज्ञाला—हॅरॉल्ड लास्की यांना—ते छुपे क्रांतिकारक वाटत होते. डॉ. आंबेडकर हे भारताच्या इतिहासाने पाहिलेले शेवटचे आणि श्रेष्ठ दर्जाचे समाजक्रांतिकारक होते यात संशय बाळगण्याचे कारण नाही. पश्चिमेकडे झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीने, *रेनेसाँ* ने हे जग पूर्ण नवे केले आहे अशी त्यांची धारणा होती. या नव्या जगातसुद्धा माणूस धर्माशिवाय जगू शकणार नाही आणि जुने धर्म तर आधुनिक ज्ञानविज्ञानाने कालबाह्य ठरविले आहेत असे त्यांचे म्हणणे होते. आंबेडकरांनाही इतर सर्व क्रांतिकारकांप्रमाणेच राजकीय क्रांती व्हावी असे वाटत होते, परंतु इतर क्रांतिकारकांत आणि बाबासाहेबांत एक मूलभूत फरक होता. या आधीच मी सांगितल्याप्रमाणे त्यांना राजकीय क्रांतीला धार्मिक आणि सांस्कृतिक क्रांतीचा पाया देणे आवश्यक वाटत होते. म्हणून ते या पूर्ण आधुनिक, जुन्यापेक्षा पूर्ण नव्या जगासाठी आणि विशेषत: संपूर्ण भारतासाठी एका नव्या धर्माच्या शोधात होते. त्यासाठी त्यांनी १९५० साली 'महाबोधी' हा नियतकालिकात एक लेख लिहून या नव्या धर्माच्या कसोट्या निश्चित केल्या होत्या. या धर्मात समाजाच्या अनुशासनाचे तत्त्व म्हणून नीतीला प्राधान्य असले पाहिजे; हा धर्म कृतिशील बनवायचा असेल तर तो तर्क आणि विवेकावर म्हणजेच विज्ञानावर आधारित असला पाहिजे; त्यातील सामाजिक नैतिकतेचा आधार स्वातंत्र्य, समता आणि बंधुता असला पाहिजे आणि त्या धर्माने कोणत्याही परिस्थितीत दारिद्र्याला पावित्र्य देता कामा नये. त्याचबरोबर आंबेडकरांनी हेसुद्धा स्पष्ट केले होते की, "आता संत-महात्म्यांच्या उदयाचा काळ संपला असून आता नवा धर्म स्थापन होणे अशक्य आहे." म्हणून त्यांनी या चार कसोट्यांवर जुने धर्म तपासून त्या पूर्ण करू शकतील असा बुद्धाचा धर्म निवडला. त्याच्या नव्या रूपाला प्रसारित करण्यासाठी त्यांनी तीन गोष्टी सांगितल्या. पैकी एक बुद्ध धम्माचा बायबलसारखा एक धर्मग्रंथ तयार करणे. त्यात बुद्धाचे संक्षिप्त चरित्र, चिनी धम्मपद, बुद्धाचा महत्त्वाचा उपदेश आणि जन्म, धम्मदीक्षा, विवाह आणि मृत्यू या वेळी केले जाणारे बौद्ध संस्कार असावेत. दुसरी गोष्ट भिक्षुसंघाच्या ध्येय आणि उद्देशांत परिवर्तन करून भिक्षुसंघाचे संघटन करणे ही होती. बुद्ध धर्माच्या भिक्षुसंघाबद्दल आंबेडकरांच्या भावना अतिशय कठोर होत्या. एक तर ते भिक्षूंच्या प्रचंड संख्येवर नाराज

होते आणि ध्यानधारणेत कालापव्यय करणाऱ्या भिक्षूंवर तर ते अधिक संतापत होते. भिक्षूंतील विद्वत्तेचा अभाव आणि सेवाभावी वृत्तीचा अभाव या गोष्टींनी आंबेडकर उद्विग्न होत असत. म्हणूनच बौद्धांचा भिक्षुसंघ म्हणजे बेकारांची भरती आहे असे त्यांनी नोंदवून ठेवले आहे. या दृष्टीने भिक्षूंनी रामकृष्ण मिशनचा आणि ख्रिश्चनांच्या जेसुइट पंथाच्या पादरी मंडळींचा आदर्श घेण्याचा सल्ला आंबेडकरांनी दिला होता. बाबासाहेबांनी त्यांच्या खाटमांडू येथील बौद्ध धर्माच्या परिषदेतील शेवटच्या भाषणात तर 'बौद्ध भिख्खू काय करीत आहेत?' असा प्रश्न विचारून संपूर्ण आशिया खंडातील तरुण कार्ल मार्क्स यांना आपला मुक्तिदाता मानीत आहेत आणि बौद्ध भिख्खूंना 'पिवळा धोका'—yellow peril—समजत आहेत या वास्तवाकडे लक्ष वेधले होते. 'कार्ल मार्क्सशी तुलना होण्याच्या योग्यतेचे बना' असा त्यांनीं भिख्खुसंघाला उपदेश केला होता. आंबेडकरांच्या दृष्टीसमोर विद्वत्ता आणि सेवाभाव असणाऱ्या कार्यकर्त्यांचा संघ म्हणजेच भिख्खुसंघ होता. तिसरी गोष्ट त्यांनी एका विश्व बौद्ध मिशनच्या स्थापनेची सांगितली होती.

बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचे बायबल ठरावे असा *बुद्ध आणि त्यांचा धम्म* हा ग्रंथ लिहिला. त्याला जगातील बौद्धांनी मान्यता दिली नाही हे खरे; परंतु त्याचे व्यवस्थित निरूपण करून, ते बौद्ध जगतापुढे पुन:पुन्हा मांडून त्यांच्या गळी उतरविण्याचे प्रयत्नही झाले नाहीत. त्यामुळे बाबासाहेबांना ज्या प्रकारचा बुद्ध धम्म जगातील मानवजातीला देण्याचा विचार होता; तसा धम्म देण्यात आंबेडकरोत्तर नेतृत्वाला यश आले नाही. त्यांचे भारत बौद्धमय करण्याचे स्वप्नही अपुरेच ठेवले गेले. मुळात बाबासाहेबांचा धर्मांतराचा प्रयोगच अनेक कारणांनी वादग्रस्त ठरला. ते हिनयान आणि महायान याऐवजी एका 'नवयाना'चा प्रयोग करीत होते आणि त्या 'नवयाना'ची भाषा, त्याचा अर्थ समजून घेण्याइतपत जागतिक बौद्धांची कुवत नव्हती. अगदी नागपूरच्या बौद्ध धम्माच्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या वेळीच ज्यांच्या हस्ते बाबासाहेबांनी धम्मदीक्षा घेतली होती त्या महास्थवीर चंद्रमणी आणि अन्य बौद्ध भिक्षूंनी एक पत्रक प्रसृत करून 'हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म या एकाच वृक्षाच्या दोन फांद्या आहेत' असे जाहीर केले होते. बाबासाहेबांनी धम्मदीक्षेच्या प्रसंगी दिलेल्या बावीस प्रतिज्ञाही अशाच वादग्रस्त ठरल्या. त्यापैकी आठ प्रतिज्ञा हिंदूधर्माचा धिक्कार करणाऱ्या होत्या म्हणून "आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारताना हिंदू धर्माचा जो धिक्कार केला तो बौद्ध धर्माच्या संस्कारात सांगितलेला नाही" अशी त्यांचे सहप्रवासी न्या. भवानी शंकर नियोगी यांची प्रतिक्रिया होती.

बाबासाहेबांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा कितीही वादग्रस्त ठरल्या होत्या तरी; पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांत त्यामुळे नवचैतन्य संचारले होते हे कबूल केले पाहिजे. कारण त्या धिक्कारातच त्यांच्या मुक्तीचा प्रारंभ त्यांनी अनुभवला होता. परंतु भारत बौद्धमय करण्याच्या मार्गात या प्रतिज्ञा—निदान त्यांपैकी हिंदू धर्माचा निषेध नोंदविणाऱ्या आठ प्रतिज्ञा तरी—निश्चितच अडसर म्हणून उभ्या राहिलेल्या दिसतात. ज्या जातिग्रस्त हिंदूंना बौद्ध करण्याचे, त्यांना समतेची दीक्षा देण्याचे बाबासाहेबांच्या मनात होते, त्या हिंदू संस्कारात वाढलेल्या जनतेशी या प्रतिज्ञांमुळे संबंधच तुटला. ज्यांना बाबासाहेबांचे स्वप्न पुरे करायचे असेल, त्यांच्यावर हा तुटलेला संबंध, ही तुटलेली नाती नव्या परिस्थितीत, नव्या दृष्टीने कशी जोडायची ही फार मोठी जबाबदारी आहे. ती प्रत्यक्ष आचरणाने, कृतिशीलतेनेच जोडावी लागतील.

आपल्या महाराष्ट्राला धर्मसुधारणेची दीर्घ परंपरा आहे. न्या. रानडे, म. जोतीराव फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर अशी ही परंपरा स्पष्ट दिसते. या परंपरेचे मुख्य सूत्र पुरोहिताची मध्यस्थी नाकारणे हे होते. न्या. रानडे यांच्या प्रार्थनासमाजाने, म. फुले यांच्या सार्वजनिक सत्य धर्माने, राजर्षी शाहू यांच्या आर्यसमाजाने आणि डॉ. आंबेडकरांच्या निरीश्वरवादी बुद्ध धम्माने वंशपरंपरागत पुरोहितशाही नाकारली हे त्यांचे धर्मसुधारणेच्या चळवळीला अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. परंतु ती धर्मसुधारणेची सुरुवात होती. तिच्या विकासक्रमात माणूस एकूणच धर्मबंधनातून मुक्त होऊन त्याने आपले माणूसपण प्राप्त करणे हे ध्येय अद्याप वास्तवात आले नव्हते. आपल्या सर्व चळवळींना जर्मनीतील ज्या मार्टिन ल्युथर यांच्या प्रॉटेस्टंट धर्मआंदोलनाची पार्श्वभूमी होती आणि कमी-अधिक प्रमाणात आपल्या सर्वच धार्मिक चळवळीवर त्याचा प्रभावही होता त्या मार्टिन ल्युथरच्या धार्मिक आंदोलनाबाबत कार्ल मार्क्स यांची प्रतिक्रिया फार बोलकी आहे. *Contribution to the Critique of Hegel's Philosophy of Law* या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी ती व्यक्त केलेली आहे. ते लिहितात :

“असे विचारण्यात येते की, जर्मनी अशा प्रकारचे क्रांतिकारी आचरण करू शकेल की, जे जर्मनीला केवळ आधुनिक राष्ट्रांच्या कार्यालयीन पातळीवर नव्हे, official level वर नव्हे; तर त्या आधुनिक राष्ट्रांचे नजीकचे भवितव्य असलेली मानवतेची उंची—height of humanity—प्राप्त करून देऊ शकेल?

“चिकित्सेचे शस्त्र अर्थातच शस्त्राच्या चिकित्सेची जागा घेऊ शकत नाही. भौतिक शक्तींना भौतिक शक्तींनीच उलथून टाकावे लागते. परंतु जनतेच्या मनाची पकड घेणारा एखादा सिद्धान्तसुद्धा भौतिक शक्ती बनू शकतो. कोणताही सिद्धान्त माणसांच्या मनाची पकड त्याच वेळी घेतो, जेव्हा तो माणसांच्या गरजा भागविण्याची खात्री देतो. ज्या क्षणी असे घडते, त्याच क्षणी तो सिद्धान्त क्रांतिकारी,—radical—बनतो. परंतु एखाद्या सिद्धांन्ताने क्रांतिकारी बनणे, म्हणजे त्याने वास्तवातील गोष्टींच्या मुळाचे आकलन करून देणे असते. परंतु माणसासाठी तर ते मूळ स्वत: माणूसच असतो. जर्मन सिद्धान्ताच्या क्रांतिकारकत्वाबद्दलचा आणि त्याच्या वास्तवातील शक्तीचा—practical energyचा—पुरावा हा त्याचा प्रारंभच मुळी धर्माच्या खात्रीशीर आणि सकारात्मक अंताच्या दिशेने सुरू झाला आहे. धर्मचिकित्सेचा अंत ***माणूस हाच माणसासाठी सर्वश्रेष्ठ प्राणी आहे*** या शिकवणुकीतून होतो. म्हणूनच ज्या संबंधांमुळे—relationsमुळे—माणूस हिणकस, गुलाम, तिरस्करणीय आणि नीच प्राणी बनतो, ते संबंध आणि ते संबंध प्रस्थापित करणाऱ्या अनुल्लंघनीय मानल्या गेलेल्या सर्व आज्ञा झुगारून दिल्या पाहिजेत. अगदी ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले तरी जर्मनीसाठी सैद्धान्तिक मुक्तीलाही—theoretical emancipationलाही—विशिष्ट प्रकारचे व्यावहारिक महत्त्व आहे. कारण जर्मनीचा *क्रांतिकारी* गतकाळ हा केवळ सैद्धान्तिक—theoreticalच—होता. तो *सुधारणावादी*च होता. ज्याप्रमाणे त्या काळात क्रांतीची सुरुवात धर्मगुरूच्या—monkच्या—मेंदूतून झाली, तशीच आता ती सुरुवात तत्त्ववेत्त्यांच्या—philosophersच्या—मेंदूतून होत आहे.

“मार्टिन ल्युथरसारख्या धर्मगुरूने माणसांना धर्मनिष्ठेच्या, pietyच्या बंधनातून मुक्त केले हे मान्य; परंतु त्याने तिच्या जागी मानवी दोषांच्या खात्रीचे, convictionचे बंधन प्रस्थापित केले. त्याने धर्माधिकारशाही खिळखिळी केली, परंतु तिच्या जागी श्रद्धेच्या अधिकाराची—Authority of faithचे—पुनर्गठन केले. त्याने पुरोहितांना सामान्य माणसे बनविले, कारण त्याने सामान्य माणसेच पुरोहित केली. He turned laymen in to Priests. त्याने बाह्य धार्मिकतेतून—outer religiocityतून—माणूस मुक्त केला, कारण त्याने धार्मिकता हा माणसाचा अंतर्गाभा—Inner man—बनविला. त्याने मानवी शरीर बंधमुक्त केले. कारण त्याने मानवी हृदय बंधनात अडकविले.

“म्हणून ल्युथरचा प्रॉटेस्टंटवाद हे जरी माणसाच्या मूळ प्रश्नाचे, समस्येचे खरे समाधान नव्हते, हे खरे असले तरी ती त्या समस्येची खरी उकल,

त्या प्रश्नाची खरी मांडणी—true setting of the problem—मात्र निश्चितच होती. त्यामुळे सामान्यजनांचा बाहेरच्या पुरोहितशाहीशी संघर्ष उरला नाही. परंतु त्यांच्या स्वत:च्या अंतर्गाभ्यातील पुरोहिताशी, त्यांच्या पुरोहिती स्वभावाशी मात्र संघर्ष तसाच शिल्लक राहिला. सामान्य जर्मन माणसाचे पुरोहितात—Priestमध्ये—झालेले प्रॉटेस्टंट संक्रमण जर का सामान्य पोपला आणि त्याच्या संपूर्ण पुरोहिती कंपूला, विशेषाधिकारवाल्यांना आणि रासवटांना मुक्त करणार असेल, तर पुरोहित बनलेल्या सामान्य जर्मनांचे तत्त्वज्ञानाच्या पातळीवर होणारे संक्रमण सामान्य जनतेला मुक्ती देईल.'' (परिशिष्ट २ पहा).

कार्ल मार्क्स यांच्या या विचारांचे नीट परिशीलन केले तर भारतातील प्रबोधनातील बऱ्याच गोष्टी आपल्याला उलगडू लागतील. न्या. रानडे यांच्या प्रार्थनासमाजाने धार्मिक कर्मकांडातून थोड्या माणसांना मुक्त केले; परंतु धार्मिकता त्यांचा अंतर्गाभा बनविली. म. फुल्यांनी पुरोहितांचे वर्चस्व झुगारून दिले, परंतु माणसांच्या मनात निर्मिकाला स्थान करून दिले. राजर्षी शाहूंनी ब्राह्मणी शंकराचार्यांचे वर्चस्व संपुष्टात आणले, परंतु त्या जागी ब्राह्मणेतर शंकराचार्यांच्या पीठाची स्थापना केली. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या अनुयायांना, हिंदू देव-देवतांना शरण जाण्यापासून रोखले, परंतु भगवान बुद्धाला शरण जाण्याचा उपदेश केला. त्यांनी हा बुद्धाचा धम्म किती विज्ञाननिष्ठ, बुद्धिनिष्ठ आहे हे तळमळून सांगितले; परंतु त्यांच्या सामान्य अनुयायांनी बुद्धाला, धम्म आणि संघाला मनोभावे शरण जाणेच पसंत केले. आज तर अगदी सामान्य कुवतीची माणसे बौद्ध भिक्षुसंघात मोठ्या प्रमाणात भरती होत आहेत. ज्यांच्याकडे ज्ञानाचा आणि सेवाभावाचा लवलेशही नाही अशा भिक्षूंच्या दर्शनासाठी लागलेल्या रांगा बाबासाहेबांना निश्चितच अभिप्रेत नव्हत्या. या सर्व चळवळींचा विकास माणसासाठी फक्त माणूसच सर्वश्रेष्ठ बाब आहे या शिकवणुकीपर्यंत करणे भाग आहे. ती त्यांच्या आचरणाचा, प्रत्यक्ष जगण्याचा भाग बनणे आवश्यक आहे. न्या. रानडे, म. फुले, राजर्षी शाहू आणि बाबासाहेब आंबेडकरांचे मानवी समस्येचे निदान बरोबर होते. त्या समस्येची खरी उकल त्यांना झालेली होती. त्यांनी त्या समस्येची खऱ्या अर्थाने मांडणी—true setting of the problem—केली होती. परंतु भारतासारख्या चमत्कारिक सामाजिक वास्तव असलेल्या देशात त्या समस्येच्या निदानाला, तिच्या उकलीला वास्तवात उतरविण्यासाठी दीर्घ काळ आणि ध्येयवादी चिकाटी लागणार हे उघड दिसत आहे.

## जगण्याचे प्रयोजन

माणूस का जगतो, असा प्रश्न विचारला तर त्याचे सरळ उत्तर 'मरण येत नाही म्हणून' असे सामान्य माणसे देतात. जन्म आणि मरण या दोन्हीही अपघाती गोष्टी आहेत. त्या माणसाच्या हातात नाहीत ही माणसाची सर्वात मोठी कमजोरी आहे. परंतु जन्म आणि मरण या दरम्यानचा काळ मात्र माणसाच्या हातात आहे. परंतु तोसुद्धा त्याने निर्मिलेला नाही, तर तो समाजविकासक्रमाच्या प्रक्रियेत इतिहासाने त्याच्यापुढे वाढून ठेवलेला आहे. माणसाचे सामर्थ्य हे आहे की माणूस त्यात हस्तक्षेप करू शकतो. त्याला स्वत:साठी आणि समाजासाठी अनुकूल बनवू शकतो. म्हणूनच माणूस हा इतिहासाचे अपत्य असला तरी तो इतिहासाचा निर्मातासुद्धा आहे. माणूस त्याच्या काळातील परिस्थिती बदलवू शकतो आणि स्वत:ही बदलत जातो. त्याच्या विकासक्रमातील प्रत्येक टप्प्यावर तो जगण्याचे प्रयोजन शोधीत होता. त्या प्रयोजनाला साध्य करणारी समाजव्यवस्था घडवीत होता. त्या प्रयोजनाला बाधा आणणारी समाजव्यवस्था मोडून काढीत होता आणि नवी घडवीत होता. म्हणून त्याने अनेक प्रदेशात क्रांत्या घडवून आणल्या.

आज जागतिकीकरणाने उपभोगांच्या वस्तूंची बाजारपेठ सर्वांना मोकळी करून दिल्याने त्यांना प्राप्त करण्यासाठी माणूस रेसचा घोडा बनला आहे. आपल्या घरात बाजारात उपलब्ध असणाऱ्या सर्व गोष्टी असाव्यात, आपले घर 'मिनी मार्केट' व्हावे असे प्रत्येकाला वाटू लागले आहे. त्या खरेदीसाठी कोणत्याही मार्गाने पैसा मिळविला तरी हरकत नाही, इतके त्याचे मन निर्ढावले आहे. आपला अठरा कोटी संख्येचा मध्यम आणि उच्च मध्यमवर्ग तर आपली मुले अमेरिकेत, सिलीकॉन व्हॅलीत जावीत; ती डॉक्टर, इंजिनिअर बनावीत म्हणून कोणत्याही मार्गाने पैसा मिळवीत आहे. घरातील आई-बाप पैसे कमावण्याचे साधन बनले आहेत. त्यांनी स्वत:ला पैसे पाडण्याचे टाकसाळ स्वत:च बनवून घेतले आहे. घरातील मुलेही त्यांच्याकडे पैसे छापण्याचे टाकसाळ याच अर्थाने पाहत असल्यामुळे नेकीने काम करून, निर्व्यसनी बनून घरात प्रामाणिकपणे फक्त आपला पगार आणणारे आई-वडील मुलांच्या नजरेतून उतरू लागले आहेत. आजचे राजकारण तर पूर्ण व्यावसायिक—प्रोफेशनल—बनले आहे. मंत्रिमंडळाची अफाट संख्या आणि पैसे खाण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील अशी खाती मिळविण्यासाठी चाललेल्या हाणामाऱ्या राजकारणाचा केवढा धंदा झालेला आहे हे स्पष्ट करतात. त्यामुळे जो मध्यमवर्ग एकेकाळी क्रांतिकारी, परिवर्तनवादी चळवळींचे नेतृत्व करीत होता; तोच आता

स्वत:च्या सुखोपभोगासाठी स्थितिशील बनला आहे. मध्यमवर्गीय पुरुषांना लाचखोरीने, भ्रष्टाचाराने ग्रासले आहे आणि केवळ पैशासाठी, आपले घर मिनी मार्केटसारखे सजविण्यासाठी, मुलांच्या शिक्षणाची लाखो रुपयांची फी कमावण्यासाठी गरीब स्त्रियांच्या बरोबरच चंगळवादी, महत्त्वाकांक्षी मध्यमवर्गीय स्त्रियाही वेश्या व्यवसायात गुंतत आहेत. डान्सिंग बार, पंचतारांकित हॉटेल्स यांच्यात जाणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रियांच्या संख्येत होणारी वाढ हा चिंतेचा विषय आहे. सुखोपभोगाच्या लालसेपायी आणि स्वनिर्मित अवाजवी स्वप्ने पूर्ण करण्याच्या वेडापायी स्त्रियांनी स्वत:ला क्रयवस्तूत परिवर्तित करून घेतले आहे. घरात खोऱ्याने पैसा आणणाऱ्याबद्दल वरवरचे कौतुक आहे, परंतु ज्या मार्गाने तो आणला जातो त्याबद्दल आत खोलवर नाराजी आहे. म्हणून कृत्रिम सुखोपभोगाच्या पाठीमागे लागलेल्या कुटुंबातील नाती विसकटत चाललेली आहेत. जुने प्रेम, जिव्हाळा, आदर आणि ममता आटत चालली आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील सर्व दालने, नृत्य, गायन, नाट्य इत्यादी कलासुद्धा बाजारू बनू लागल्या आहेत. त्याही क्रयवस्तू—कमॉडिटी—बनण्याची प्रक्रिया वेग घेत आहे. आपल्या देशातील उच्च शिक्षण जवळ जवळ अर्थशून्य, निकामी आणि कालबाह्य बनले आहे. या साऱ्या परिस्थितीत सामान्य माणूस असहाय बनला आहे. समाजवास्तवात परिवर्तन घडवू पाहणाऱ्या चळवळींची विकलांग अवस्था त्याला अधिक परावलंबी, अधिक भयग्रस्त बनवीत आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने सर्व जगातील नैसर्गिक साधनसामग्रीवर डोळा ठेवून पूर्ण जगाला ताब्यात ठेवण्यासाठी जागतिक संस्था स्थापिल्या आहेत. जगातील सारी युद्धे आणि शांतता त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहेत. गेल्या दोन-तीनशे वर्षांत माणसांनी विकासाची अनेक शिखरे गाठली परंतु त्याने निर्माण केलेल्या ऐश्वर्यावर मूठभरांचीच मालकी राहिली. श्रीमंत अधिक श्रीमंत आणि त्यांच्या तुलनेत गरीब अधिक गरीब बनण्याचा हा काळ आहे. ही परिस्थिती व्यापक क्रांतिकारी परिवर्तनाशिवाय बदलणार नाही आणि ते परिवर्तन पूर्णपणे नव्या दृष्टींनी, नव्या डावपेचांनी करणारी चळवळ माणसे लवकरच जन्माला घालतील यावर माझा विश्वास आहे. ही चळवळ पोथीनिष्ठ, सांप्रदायिक, एकारलेली असणार नाही. म्हणून आजचा काळ मला संधिकाळ वाटतो. मानवी विकासक्रमातील प्रत्येक टप्प्यावर अशा संधिकाळात माणसे भयभीत, असहाय आणि एकाकी झाली, परंतु स्वत:चे स्वत्व त्यांनी परिश्रमपूर्वक जपले. म्हणून आज आपण आपल्या आजूबाजूची परिस्थिती बदलवण्याइतपत सक्षम आणि बलवान नसलो

तरी आपण आपल्याला जपू शकतो. आपणच आपल्याला जपणे, प्रवाहपतित होऊ न देणे हे आणि एवढेच आज आपल्या हातात आहे. त्यासाठी आपण आपल्यातील सर्व सामर्थ्य वापरले तरच आपल्याला नवा इतिहास घडविता येऊ शकेल.

आपण आपल्याला जपणे म्हणजे आपणच आपल्या जगण्याला अर्थ देणे असते; जगणे अर्थपूर्ण करणे असते. परंतु माणूस केवळ जगत नाही तो जगणे सुंदरही करतो, ते सजवीतही असतो. म्हणूनच जगण्याच्या प्रक्रियेत नित्य नूतन जन्म घेत घेतच भवसागर पार करावा लागतो. आईच्या पोटातून बाहेर येणे म्हणजे जन्मणे नव्हे; ती जन्माला येण्याची सुरुवात आहे. मानवी जन्म ही एक जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. जीवनात माणूस म्हणून जन्मण्याचे कोणत्या क्षणी भाग्य लाभेल, हे कोणालाच सांगता येणार नाही. अनेक दुर्दैवी जीवांना तो प्राप्त होण्यापूर्वीच मृत्यू गाठतो आणि सारा खेळ संपतो. या साऱ्या प्रक्रियेला भगवान बुद्धांनी *प्रतित्यसमुत्पाद* अशी संज्ञा दिली आहे. माणसाच्या जगण्याचे प्रयोजन त्याच्यातील सुप्त शक्तीच्या प्रकटीकरणात आहे. आपल्यात एक सुप्त सामर्थ्य आहे आणि त्याचे प्रकटीकरण आपणच करू शकतो, त्याचा उपयोग स्वत:सहित सर्वांच्या कल्याणासाठी करू शकतो; याचे माणसाला येणारे भान हेच खरे आत्मभान आहे. यालाच मी अध्यात्म मानतो. माणसातील ही प्रकट होणारी सुप्त शक्तीच संपूर्ण जग बदलवू शकते यावर माझा विश्वास आहे. कार्ल मार्क्स यांनी म्हटले होते, "या जगाचे स्वरूप कसे आहे याचे निरूपण तत्त्ववेत्त्यांनी विविध पद्धतींनी केले आहे, परंतु मुद्दा जग बदलण्याचा आहे." मार्क्स यांचे हेच वचन बाबासाहेबांनी *बुद्ध आणि त्यांचा धम्म* या ग्रंथात धर्म आणि धम्म यातील फरक स्पष्ट करताना वापरले आहे. "धर्माचा उद्देश या जगाच्या उगमाचे स्पष्टीकरण देणे हा आहे; परंतु धम्माचा उद्देश मात्र या जगाची पुनर्रचना—reconstruction—करणे हा आहे" असे बाबासाहेबांनी म्हटले आहे. हे जग बदलण्याचा म्हणा किंवा या जगाची पुनर्रचना करण्याचा म्हणा—तुम्ही कोणताही शब्द वापरा—परंतु त्यासाठी प्रयत्न मात्र माणूसच करणार आहे. त्याची संघशक्तीच करणार आहे. तो प्रयत्न त्याच्यातील सुप्त शक्तीच्या प्रकटीकरणाशिवाय अशक्य आहे, एवढेच मला आपल्याला सांगायचे आहे. त्यासाठी त्याने माणूस म्हणून नित्य नूतन जन्म घेण्याची प्रक्रिया वेगवान केली पाहिजे कारण त्याच्याजवळ काळ फार थोडा आहे एवढीच आठवण मला तुम्हाला करून द्यायची आहे.

आपण आपल्या जगण्याचे प्रयोजन जगणे अर्थपूर्ण करणे आणि ते सुंदर करणे, नटविणे किंवा सजविणे असे मानले तरच अमंगल आणि दुष्ट प्रवृत्तींविरुद्ध आपल्याला ताठ मानेने उभे राहता येईल. इतकेच नव्हे तर जगण्यातील सार्थता आणि सौंदर्य आपल्याला मृत्यूच्या भीतीपासूनही भयमुक्त करील. मृत्यूच्या स्वागताचे बळ, त्याचा आनंदसोहळा साजरा करण्याचे सामर्थ्य आपल्याला कमावता येईल. तेच बळ, तेच सामर्थ्य सिद्धार्थ गौतमाने कमावले आणि ते बुद्ध बनले. तेच सामर्थ्य त्यांच्या अनेक शिष्य आणि शिष्यांनी कमावले आणि त्या निर्वाणाला उपलब्ध झाल्या. तेच सामर्थ्य चोखोबा आणि तुकोबांच्या अनेक अभंगांतून प्रकट झाले आहे.

## हा तर आनंदसोहळा बनावा

आपला मृत्यू दुःखद नव्हे तर आनंदसोहळा बनावा यापेक्षा अधिक भाग्य कोणते असू शकते? तीच तर खरी जगण्याची सार्थकता आहे. या सार्थकतेला स्पष्ट करणारे अनेक संदर्भ बौद्धांच्या पाली वाङ्मयात आहेत. त्यांपैकी काहींची मी माझ्या *मानव आणि धर्मचिंतन* या ग्रंथात मुक्तछंदात भाषांतरे केली आहेत. आजचा माणूस दिवसागणीक त्याच्या माणूसपणापासून दूर चालला आहे. राजकारणी मंडळी तर नवनव्या मुखवट्याशिवाय जगूच शकत नाही अशी स्थिती आहे. सामान्य माणसाला आपण खोट्या माणसांच्या गर्दीत वेढलो गेल्याची अगतिकता तीव्र होऊ लागली आहे. या गर्दीतही प्रेम देणारी, आधार वाटावा अशी कॉ. गोविंदराव पानसरे यांच्यासारखी तुरळक माणसे भेटणे हे आपले भाग्य आहे. जीवनात प्रेम आणि करुणा या जगण्याचे ऊर्जास्रोत आहेत. त्यांच्या आधारानेच जगणे सार्थ आणि सुंदर बनविता येते. ज्यांचे जगणे सार्थ आणि सुंदर होते तेच मृत्यूपासून भयमुक्त होतात. भगवान बुद्धाप्रमाणे मृत्यूच्या स्वागताच्या तयारीला लागतात. संत तुकारामाप्रमाणे मृत्यूचा आनंदसोहळा अनुभवतात. त्या शेवटच्या निरोपाच्या वेळी बुद्धाचे शेवटचे शब्द असतात, "भिख्खूंनो, असा सावधान! कारण सर्व संस्कार व्ययधर्मी असतात." बुद्धांची शेवटची कृती असते ध्यानाची, अमृतानुभवाच्या लाभाची आणि त्यांची शेवटची इच्छा असते चक्रवर्ती राजाच्या मृतदेहाप्रमाणे सर्व प्रकारच्या सुगंधी लाकडावर, त्याच्या चितेवर, स्वतःचा मृतदेह भस्म करण्याची. आणि शेवटची आज्ञा असते; लोकांनी प्रसन्न चित्ताने फुलांचा वर्षाव करून सुगंधी चूर्ण उधळण्याची. म्हणूनच भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण हा मृत्यूच्या स्वागताचा आनंदसोहळा बनला होता.

असाच आनंदसोहळा मध्ययुगात या मराठी मातीवर तुकारामासारख्या एका श्रेष्ठ संताने साजरा केला होता. मृत्यूचा अनुभव ही फक्त माणसाच्याच वाट्याला आलेली गोष्ट आहे. तोच साऱ्या जगण्याचे सार आहे. हाव आणि अहंकारग्रस्त माणसे या अनुभवापासून शेकडो कोस दूर असतात. म्हणूनच ते स्वत:चे आणि समाजाचेही जगणे विद्रूप करून टाकतात. अहंकाराला बळी पडून जगणे क्रूर आणि हिंस्र करून टाकतात. तुकोबांनी जेव्हा हा अनुभव घेतला तेव्हा ते आनंदाने न्हाताना गात होते,

*आपुले मरण पाहिले म्या डोळा । तो जाला सोहळा अनुपम्य ॥*
*आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवने । सर्वात्मकपणे भोग जाला ॥*
*एकदेशी होतो अहंकारे आथिला । त्याच्या त्यागे जाला सुकाळ हा ॥*
*फिटले सुतक जन्ममरणाचे । मी माझ्या संकोचे दुरी जालो ॥*
*नारायणे दिला वसतीस ठाव । ठेवुनिया भाव ठेलो पायी ॥*
*तुका म्हणे दिले उमटुनि जगी । घेतले ते अंगी लावुनिया ॥*

आपल्यालाही हा अनुपम सोहळा अनुभवण्याचे भाग्य लाभो. तेवढी पात्रता कमावण्यास यश येवो आणि आपल्या सर्वांचे जीवन सार्थ आणि सुंदर बनो अशी इच्छा प्रकट करतो. आपण केलेल्या अलोट गर्दीचे स्वागत करतो आणि दीड-पावणेदोन तास भाषण ऐकण्याच्या आपल्या सहनशीलतेचे कौतुक करून हे लांबलेले भाषण संपवितो.

धन्यवाद!

# परिशिष्ट १

*Religious* distress is at the same time the *expression* of real distress and also the *protest* against real distress. Religion is the sigh of the oppressed creature, the heart of a heartless world, just as it is the spirit of spiritless conditions. It is the *opium* of the people.

To abolish religion as the *illusory* happiness of the people is to demand their *real* happiness. The demand to give up illusions about the existing state of affairs is the *demand to give up a state of affairs which needs illusions.* The criticism of religion is therefore *in embryo the criticism of the vale of tears,* the *halo* of which is religion. (KARL MARX FREDERICK ENGELS, COLLECTED WORKS, VOL 3; Progress Publishers, Moscow (1975), pp. 175-176)

# परिशिष्ट २

It is asked : can Germany attain a practice *a la hauteur des principes*, i.e., a *revolution* which will raise it not only to the *official level* of the modern nations but to the *height of humanity* which will be the near future of those nations?

The weapon of criticism cannot, of course, replace criticism by weapons, material force must be overthrown by material force; but theory also becomes a material force as soon as it has gripped the masses. Theory is capable of gripping the masses as soon as it demonstrates *ad hominem*, and it demonstrates *ad hominem* as soon as it becomes radical. To be radical is to grasp the root of the matter. But for man the root is man himself. The evident proof of the radicalism of German theory, and hence of its practical energy, is that it proceeds from a resolute *positive* abolition of religion. The criticism of religion ends with the teaching that *man* is *the highest being for man*, hence with the *categorical imperative to overthrow all relations* in which man is a debased, enslaved, forsaken, despicable being, relations which cannot be better described than by the exclamation of a Frenchman when it was planned to introduce a tax on dogs : Poor dogs! They want to treat you like human beings!

Even historically, theoretical emancipation has specific practical significance for Germany. For Germany's *revolutionary* past is theoretical, it is the *Reformation*. As the revolution then began in the brain of the *monk*, so now it begins in the brain of the *philosopher.*

*Luther,* we grant, overcame the bondage of *piety* by replacing it by the bondage of *conviction*. He shattered faith in authority because he restored the authority of faith. He turned priests into laymen because he turned laymen into priests. He freed man from outer religiosity because he made religiosity the inner man. He freed the body from chains because he enchained the heart.

But if Protestantism was not the true solution it was at least the true setting of the problem. It was no longer a case of the layman's struggle against the *priest outside himself* but of his struggle against his *own priest inside himself,* his *priestly nature*. And if the Protestant transformation of the German laymen into priests emancipated the lay popes, the *princes,* with the whole of their priestly clique, the privileged and philistines, the philosophical transformation of priestly Germans into men will emancipate the *people*.(KARL MARX FREDERICK ENGELS, COLLECTED WORKS, VOL 3; Progress Publishers, Moscow (1975), p. 182)

३७
Acc. No. 124280
31·3·08

## डॉ. रावसाहेब कसबे

जन्म : १९४४. शिक्षण : एम्.ए. पीएच्.डी. संगमनेर महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्रपाठक असलेल्या डॉ. कसबे यांना प्रगतिशील विचारवंत म्हणून महाराष्ट्र ओळखतो. 'झोत' हे रा. स्व. संघाच्या विचारसरणीवर घणाघाती टीका करणारे त्यांचे पुस्तक बरेच गाजले. 'आंबेडकर आणि मार्क्स', 'हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद', 'मानव आणि धर्मचिंतन', 'आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' ही त्यांची इतर पुस्तके. यांशिवाय काही संपादित पुस्तके व पुस्तिका प्रकाशित. अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन (१९८७), विचारवेध संमेलन (१९९४), बंधुता साहित्य संमेलन (२००१) यांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. युगांतर प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार (नाशिक), सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार (पुणे), नारायण मेघाजी लोखंडे पुरस्कार (पुणे), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार (नवी दिल्ली) या गौरव पुरस्कारांसह प्रियदर्शनी अकादमी, महाराष्ट्र साहित्य परिषद, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र फाउण्डेशन, मराठवाडा साहित्य परिषद, आंबेडकर अकादमी इत्यादी संस्थांतर्फे ग्रंथपुरस्कारांद्वारे डॉ. कसबे सन्मानित झाले आहेत.

प्रस्तुत पुस्तिका म्हणजे ऑक्टोबर २००३ मध्ये श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर येथे कॉ. अवी पानसरे स्मृती व्याख्यानमालेत डॉ. रावसाहेब कसबे यांनी दिलेले व्याख्यान आहे.

आजच्या काळात धर्मचिकित्सेची टाळता न येण्याजोगी निकड जाणवते आहे. या दृष्टिकोनातून डॉ. कसबे यांनी प्रस्थापित धर्माची बलस्थाने विशद केली असून सध्याच्या मानवी विकासाच्या संधिकालात धर्म जीवन जगण्यातील नवा अर्थ कशा प्रकारे प्रतिपादन करू शकेल याचे विवेचन केले आहे.

.......................................................................................................

## श्रमिक प्रतिष्ठान

समाजजीवनात आर्थिक बाजूला प्रमुख स्थान असते. तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनालाही महत्त्व असते. सर्व शोषित समाजाचे नेतृत्व करण्याची ऐतिहासिक जबाबदारी संघटित कामगारांनी पार पाडावी अशी रास्त अपेक्षा असते व आहे. ही अपेक्षा अजूनही पूर्ण होत नाही. या एकांगी अर्थवादी प्रवृत्तीवर मात करण्याचे एक छोटेसे साधन म्हणून 'श्रमिक प्रतिष्ठान'ची स्थापना करण्यात आली. समाजाचे अर्थकारण, समाजका[illegible] योग्य जाणिवा वृद्धिंगत करणे आणि विविध कृतींना प्रोत[illegible] आहे. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बँक एम्प्लॉईज युनियन, सदन[illegible] आयटक कामगार केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त प्रयत्ना[illegible] लोकशाहीर कॉ. अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त जिल्ह्यात[illegible] सुर्वे यांना कबीर पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार; कवी संमेलन; सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषयांवर नामवंत अभ्यासकांची व्याख्याने; नाट्य अभिनय शिबिर, विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर इत्यादी उपक्रम प्रतिष्ठानने राबविले आहेत.

Library IIAS, Shimla
MR 306 K 15 D
00124280